# "शासकीय पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र"

## मूल्यमापन अहवाल

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२०२१

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचविण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या लाभांचे आदिवासींची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, प्रगती, आरोग्य इत्यादींवर झालेला परिणाम/बदल याबाबतचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या स्वायत्त संस्थेमार्फत करण्यात येते.

राज्यातील अनुसूचित जमातीसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मार्फत शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक व आरोग्याविषयक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. अनुसूचित जमातीची बहुतांश मुले-मुली नोकरीसाठी आवश्यक असलेली किमान अर्हता प्राप्त करत असूनही आदिवासी वस्ती असलेला भाग डोंगराळ व दुर्गम असल्यामुळे, तसेच तेथील प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे युवकांना व्यवसाय शिक्षणाच्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. परिणामी सुशिक्षित असूनही आदिवासी विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहतात. आदिवासी विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहू नये व त्यांच्यात रोजगाराभिमुख कौशल्य विकसित व्हावे, तसेच दुर्गम व डोंगराळ भागातील लोकांना गरजेची यंत्रे/अवजारे दुरुस्त करून घेण्यासाठी शहराकडे धाव घ्यावी लागू नये म्हणून अशा भागात कुशल कारागीर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व आदिवासी युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने विशेष केंद्रीय सहाय्य या योजनेमधून शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळांमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. १) एएससी- १०९३/प्र.क्र.२७१/का.१३, दि. १४/०८/१९९७ अन्वये ४ ठिकाणी व २) शाआशा- २००३/प्र.क्र.१०७/का.१३, दि. ३०/०१/२००४ अन्वये नवीन ११ ठिकाणी अशा एकूण १५ ठिकाणी (शासकीय आश्रमशाळांमध्ये) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मंजुरी देण्यात आली.

सदर योजना सुरु झालेपासून राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम अद्यावत केले नसल्यामुळे तसेच अल्प विद्यार्थी प्रतिसाद वा अन्य कारणांमुळे काही केंद्रे बंद असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर व्यवसाय प्रशिक्षण चालू ठेवावी किंवा बंद करण्यात यावी, चालू ठेवायची असल्यास प्रस्तुत केंद्रांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचे मुल्यांकन करून सुधारित अभ्यासक्रम कशाप्रकारे राबविता येईल तसेच सदर केंद्र बंद करावयाची झाल्यास कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कसे व कुठे सामावून घेता येईल याबाबत आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. व्यशि-

२०२०/प्र.क्र.३८/का.९ दि.०१/१२/२०२० अन्वये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत मूल्यमापन अभ्यास करून शिफारस करण्यास नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील ए.क्षे.वि.का. कक्षामार्फत मूल्यमापन अभ्यासासाठी प्रश्नावल्या तयार करून व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांकडून माहिती संकलित केली आहे. तसेच व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांबाबत सर्व अपर आयुक्त कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यरत असलेले सर्व प्रकल्प कार्यालय यांचे कडून अभिप्रायाची संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहे.

मूल्यमापन अभ्यास अहवालासंबंधीची प्रश्नावली तयार करणे, प्राथमिक माहिती मिळविणे व आलेल्या माहितीचे तक्तीकरण, पृथ:करण करणे आणि आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्याची कामे श्री. हंसध्वज सोनवणे, उपसंचालक यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती प्रियांका बोकिल, संशोधन अधिकारी, श्री गणेश चिंचकर, संशोधन सहायक व श्री. ब्रम्हानंद देशमुख, प्रकल्प समन्वयक यांनी पूर्ण केलेले आहे व मूल्यमापन अहवाल लेखनाचे काम श्री. ब्रम्हानंद देशमुख, प्रकल्प समन्वयक यांनी पूर्ण केले आहे.

सदर मूल्यमापन अभ्यास अहवालाचा आदिवासी विकास विभागास व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांच्याबाबतीत पुढील धोरण ठरविण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

दिनांक : 26/11/2021

ठिकाण : पुणे

**(डॉ राजेंद्र भारुड,** भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | विषय | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | | प्रस्तावना | १-२ |
| २. | | अनुक्रमणिका | ३-५ |
| ३. | | तक्त्यांची यादी | ६-८ |
| ४. | | आकृत्यांची यादी | ९-१० |
| ५. | **प्रकरण पहिले** | **योजनेची पार्श्वभूमी** | **११-१५** |
| | १.१. | प्रस्तावना | ११ |
| | १.२. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापनेची उद्दिष्टे | १२ |
| | १.३. | योजनेचे स्वरूप | १२-१३ |
| | १.४. | अपर आयुक्त कार्यालय निहाय एकूण व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची संख्या | १३ |
| | १.५. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरु करण्यात आलेला दिनांक व वर्ष, अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय, तालुका, जिल्हा व अभ्यासक्रम निहाय माहिती | १४-१५ |
| ६. | **प्रकरण दुसरे** | **मूल्यमापनाची कार्यपद्धती** | **१६-१८** |
| | २.१. | मूल्यमापन अभ्यासासाठी गठीत समिती | १६ |
| | २.२. | समितीची कार्यकक्षा | १६ |
| | २.३. | मूल्यमापनाची उद्दिष्टे | १७ |
| | २.४. | मूल्यमापनाची पद्धती | १८ |
| ७. | **प्रकरण तिसरे** | **माहितीचे विश्लेषण** | **१९-८४** |
| | **३.१.** | **व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीचे विश्लेषण** | **१९-४३** |
| | ३.१.१. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून प्रश्नावली मार्फत आलेल्या माहितीचे विश्लेषण | १९-३८ |

| अ.क्र. | प्रकरण | विषय | पान क्र. |
|---|---|---|---|
| ७. | ३.१.२. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र येथे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती | ३९-४३ |
| | **३.२.** | **अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय यांचे कडून आलेली माहितीचे विश्लेषण व अभिप्राय** | **४४-४७** |
| | ३.२.१. | अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, अमरावती यांचे अभिप्राय | ४५-४६ |
| | ३.२.२. | अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नाशिक यांचे अभिप्राय | ४७ |
| | ३.२.३. | अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, ठाणे यांचे अभिप्राय | ४७ |
| | ३.२.४. | अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नागपूर यांचे अभिप्राय | ४७ |
| | **३.३.** | **एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीचे विश्लेषण** | **४८-६०** |
| | **३.४.** | **एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेले अभिप्राय** | **६१-८४** |
| | ३.४.१. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांचे अभिप्राय | ६१-६५ |
| | ३.४.२. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट यांचे अभिप्राय | ६५-६७ |
| | ३.४.३. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांचे अभिप्राय | ६८-७२ |
| | ३.४.४. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांचे अभिप्राय | ७२-७३ |
| | ३.४.५. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण यांचे अभिप्राय | ७४-७५ |
| | ३.४.६. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा यांचे अभिप्राय | ७६-७७ |
| | ३.४.७. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल यांचे अभिप्राय | ७७-७९ |

| अ.क्र. | प्रकरण | विषय | पान क्र. |
| --- | --- | --- | --- |
| ७. | ३.४.८. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांचे अभिप्राय | ८० |
| | ३.४.९. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांचे अभिप्राय | ८१ |
| | ३.४.१०. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचे अभिप्राय | ८१-८२ |
| | ३.४.११. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड यांचे अभिप्राय | ८२ |
| | ३.४.१२. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचे अभिप्राय | ८३-८४ |
| | ३.४.१३. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांचे अभिप्राय | ८४ |
| | ३.४.१४. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी यांचे अभिप्राय | ८४ |
| | ३.४.१५. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांचे अभिप्राय | ८४ |
| ८. | **प्रकरण चौथे** | **निष्कर्ष व शिफारशी** | **८५-९४** |
| | **४.१.** | **निष्कर्ष** | **८५-९२** |
| | ४.१.१. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे आलेले निष्कर्ष | ८५-८७ |
| | ४.१.२. | अपर आयुक्त कार्यालय यांचे कडून प्राप्त झालेली माहिती व अभिप्रायाच्या आधारे आलेले निष्कर्ष | ८८-८९ |
| | ४.१.३. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून प्राप्त झालेली माहिती व अभिप्रायाच्या आधारे आलेले निष्कर्ष | ८९-९२ |
| | **४.२.** | **शिफारशी** | **९२-९४** |
| ९. | | **प्रश्नावली** | **९५-१०४** |
| | | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचेसाठीची प्रश्नावली | ९५-९९ |
| | | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचेसाठीची प्रश्नावली | १००-१०४ |
| १० | | शासन निर्णय | १०५-१०७ |

# तक्त्यांची यादी


| तक्ता क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कंत्राटी कर्मचाऱ्यांची पद व वेतन निहाय माहिती | १३ |
| २. | कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेल्या वाढीसंबंधीची माहिती | १३ |
| ३. | अपर आयुक्त कार्यालय निहाय एकूण व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची संख्या | १३ |
| ४. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची सुरु करण्यात आलेला दिनांक व वर्ष, अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय, तालुका, जिल्हा व अभ्यासक्रम निहाय माहिती | १४-१५ |
| ५. | प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचेकडून प्रश्नावली मार्फत मूल्यमापनसंबंधी उपलब्ध झालेली प्राप्त व प्राप्त माहिती | १८ |
| ६. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची सुरुवात झाल्यापासून आजतगायत बाब निहाय झालेल्या खर्चाचा तपशील | १९-२३ |
| ७. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरुवात झाल्यापासून आजतगायत अभ्यासक्रम निहाय व वर्ष निहाय प्रवेश घेतलेल्या व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | २४ |
| ८. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पुढील तीन महिने नगरातील अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्धतेबाबतची माहिती | २५ |
| ९. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी विद्यार्थी संख्या उपलब्धतेबाबतची माहिती | २६ |
| १०. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याची कारणे | २७ |
| ११. | व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थींच्या उत्सुकतेबाबतची माहिती | २८ |
| १२. | व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी उत्सुक नसल्याची कारणे | २९ |
| १३. | प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभ्यासक्रमावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षेबद्दलची माहिती | ३० |
| १४. | प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणामुळे मिळणाऱ्या रोजगाराबाबतची माहिती | ३० |

| तक्ता क्र. | प्रकरण | विषय |
|---|---|---|
| १५. | प्रशिक्षण केंद्रात चालू अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर व्यवसाय अभ्यासक्रम मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेबाबत | ३१ |
| १६. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची माहिती | ३३ |
| १७. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची कारणे | ३४ |
| १८. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद न करणेबाबतची कारणे | ३५ |
| १९. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करणेबाबतची माहिती | ३६ |
| २०. | कंत्राटी कर्मचाऱ्यांचा इतर कामासाठी वापर करणेबाबतचे मत | ३७ |
| २१. | कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवालाबाबतची माहिती | ३८ |
| २२. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व पदनाम निहाय कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती | ३९ |
| २३. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व संवर्ग निहाय कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती | ४० |
| २४. | कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व वय संवर्गानुसार वर्गीकरण | ४१ |
| २५. | कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व शिक्षणस्तर निहाय वर्गीकरण | ४२ |
| २६. | आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पदनाम निहाय वर्गीकरण | ४३ |
| २७. | व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण केंद्र व अभ्यासक्रम निहाय माहिती | ४४ |
| २८. | प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देणेबाबतची माहिती | ४८ |
| २९. | प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी न देण्याची कारणे | ४९ |

| तक्ता क्र. | प्रकरण | विषय |
| --- | --- | --- |
| ३०. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागवण्याबाबतची माहिती | ५० |
| ३१. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रणाबाबतची माहिती | ५१ |
| ३२. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवडीबाबतची माहिती | ५१ |
| ३३. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड पद्धती बाबतची माहिती | ५२ |
| ३४. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशाच्या कालावधी बाबतची माहिती | ५३ |
| ३५. | कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्याबाबतची माहिती | ५५ |
| ३६. | प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देणेबाबतची माहिती | ५६ |
| ३७. | प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवित असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेणेबाबतची माहिती | ५७ |
| ३८. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेबाबतची माहिती | ५८ |
| ३९. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवणेबाबतची माहिती | ५९ |
| ४०. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची सद्यस्थिती | ६० |

# आकृत्यांची यादी


| आकृती क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना तीन महिने नगरात अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध करून देणेबाबतची माहिती | २५ |
| २. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी विद्यार्थी संख्या उपलब्धतेबाबतची माहिती | २६ |
| ३. | व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थींच्या उत्सुकतेबाबतची माहिती | २८ |
| ४. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची माहिती | ३३ |
| ५. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करणेबाबतची माहिती | ३६ |
| ६. | कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवालाबाबतची माहिती | ३८ |
| ७. | कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व वय संवर्गानुसार वर्गीकरण | ४१ |
| ८. | आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पदनाम निहाय वर्गीकरण | ४३ |
| ९. | प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देणेबाबतची माहिती | ४८ |
| १०. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागवण्याबाबतची माहिती | ५० |
| ११. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवरील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड पद्धती बाबतची माहिती | ५२ |
| १२. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशाच्या कालावधी बाबतची माहिती | ५४ |
| १३. | कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्याबाबतची माहिती | ५५ |

| आकृती क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १४. | प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देणेबाबतची माहिती | ५६ |
| १५. | प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवित असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेणेबाबतची माहिती | ५७ |
| १६. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवणेबाबतची माहिती | ५९ |

# प्रकरण पहिले

# योजनेची पार्श्वभूमी

**१.१. प्रस्तावना :**

राज्यातील अनुसूचित जमातीसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मार्फत शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक व आरोग्याविषयक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. अनुसूचित जमातीची बहुतांश मुले-मुली नोकरीसाठी आवश्यक असलेली किमान अर्हता प्राप्त करत असून ही आदिवासी वस्ती असलेला भाग डोंगराळ व दुर्गम असल्यामुळे, तसेच तेथील प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे युवकांना व्यवसाय शिक्षणाच्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. परिणामी सुशिक्षित असूनही आदिवासी विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहतात. आदिवासी विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहू नये व त्यांच्यात रोजगाराभिमुख कौशल्य विकसित व्हावे, तसेच दुर्गम व डोंगराळ भागातील लोकांना गरजेची यंत्रे/अवजारे दुरुस्त करून घेण्यासाठी शहराकडे धाव घ्यावी लागू नये म्हणून अशा भागात कुशल कारागीर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व आदिवासी युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने व्यवसाय प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेण्याचे निश्चित केले. प्रशिक्षित झालेल्या आदिवासी युवकांना आपला स्वत:चा व्यवसाय त्यांचे गावात किंवा जवळच्या शहरात सुरु करता येईल, पर्यायाने त्याचा फायदा स्थानिक आदिवासी जनतेला सहज मिळेल अशी धारणा व्यवसाय प्रशिक्षणाचा उपक्रम सुरु करण्यामागे होती.

"औद्योगिक प्रशिक्षण संस्था" किंवा "व्यवसाय प्रशिक्षण संस्था" नव्याने निर्माण करणे ही खर्चिक बाब असल्याने वरील बाबींचा विचार करून राज्य शासनाने विशेष केंद्रीय सहाय्य या योजनेमधून शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळांमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. **१)** एएससी - १०९३/प्र.क्र.२७१/का.१३, दि. १४/०८/१९९७ अन्वये ४ ठिकाणी व **२)** शाआशा–२००३/प्र.क्र.१०७/का.१३, दि. ३०/०१/२००४ अन्वये नवीन ११ ठिकाणी अशा एकूण १५ ठिकाणी (शासकीय आश्रमशाळांमध्ये) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मंजुरी देण्यात आली.

## १.२. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापनेची उद्दिष्टे :

- आदिवासी तरुणांमध्ये रोजराभिमुख कौशल्य निर्माण करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
- आदिवासी तरुणांमध्ये आर्थिक उत्पन्न वाढीच्या दृष्टीने आधुनिक कौशल्य निर्माण करणे.
- आदिवासी बहुल भागात कुशल कारागिरांची निर्मिती करणे.
- आदिवासी तरुणांना स्थानिक परिसरात व्यवसाय करण्यास संधी उपलब्ध करून देणे.

## १.३. योजनेचे स्वरूप :

आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय - एएससी - १०९३/प्र.क्र.२७१/का.१३, दि. १४/०८/१९९७ अन्वये सदर प्रशिक्षणातील प्रत्येक अभ्यासक्रमाचा कालावधी ४ महिन्याचा असेल. प्रशिक्षण केंद्रामध्ये ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल व १२ महिन्याच्या कालावधीत प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार ३ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येईल. आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१०/प्र.क्र.८४/का.१७, दि. ०५/०५/२०११ अन्वये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रति केंद्र १०० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेतील. त्यानंतर ३ महिने त्यांना नगरातील अथवा उपनगरातील कार्यशाळेत सराव प्रात्यक्षिकाची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. या व्यवसाय अभ्यासक्रमासाठी फक्त अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असून हे विद्यार्थी १० वी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणार्थींना दरमहा रु. ३५०/- प्रमाणे विद्यावेतन देय आहे. आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. शाआशा-२००३/प्र.क्र.१०७/का.१३, दि. ३०/०१/२००४ अन्वये प्रशिक्षणार्थींना दरमहा रु. ४००/- प्रमाणे विद्यावेतन देय आहे व आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१०/प्र.क्र.८४/का.१७, दि. ०५/०५/२०११ अन्वये दि. ०१/०४/२००९ पासून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना दरमहा रु. ७००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यास शासनाने मंजुरी दिली.

आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय - एएससी - १०९३/प्र.क्र.२७१/का.१३, दि. १४/०८/१९९७ अन्वये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी व इतर कार्यालयीन कामकाज करण्यासाठी कर्मचारी वर्ग नेमतांना तो मानधनावर म्हणजेच दरमहा कायम वेतनावर नेमण्यात यावा. त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारे कोणतेही फायदे मिळणार नाही असे स्पष्ट केले आहे. पुढील तक्त्यात कर्मचाऱ्यांची पद व वेतन निहाय माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | पदनाम | दरमहा मिळणारे मानधन (रु.) |
|---|---|---|
| १ | मुख्य निदेशक | ३५०० |
| २ | गट निदेशक | २५०० |
| ३ | कार्यशाळा परिचारक | १५०० |
| ४ | लेखापाल | २००० |
| ५ | शिपाई | १५०० |

आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१०/प्र.क्र.८४/का.१७, दि. ०५/०५/२०११ अन्वये मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात केलेली वाढ पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | पदनाम | दरमहा मिळणारे मानधन (रु.) |
|---|---|---|
| १ | मुख्य निदेशक | १०५०० |
| २ | गट निदेशक | ७५०० |
| ३ | कार्यशाळा परिचारक | ४५०० |
| ४ | लेखापाल | ६००० |
| ५ | शिपाई | ४५०० |

## १.४. अपर आयुक्त कार्यालय निहाय एकूण व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची संख्या :

**तक्ता क्र. ३**

| अ.क्र. | अपर आयुक्त कार्यालय | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची संख्या |
|---|---|---|
| १ | अपर आयुक्त कार्यालय, ठाणे | ३ |
| २ | अपर आयुक्त कार्यालय, नाशिक | ४ |
| ३ | अपर आयुक्त कार्यालय, अमरावती | ३ |
| ४ | अपर आयुक्त कार्यालय, नागपूर | ५ |
| **एकूण** | | **१५** |

(स्रोत —अपर आयुक्त कार्यालय नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर यांचेकडून आलेल्या माहितीच्या आधारे)

एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रापैकी अपर आयुक्त कार्यालय, ठाणे अंतर्गत ३, अपर आयुक्त कार्यालय, नाशिक अंतर्गत ४, अपर आयुक्त कार्यालय, अमरावती अंतर्गत ३, अपर आयुक्त कार्यालय, नागपूर अंतर्गत ५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र आहेत.

## १.५. व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरु करण्यात आलेला दिनांक व वर्ष, अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय, तालुका, जिल्हा व अभ्यासक्रम निहाय माहिती :

**तक्ता क्र. ४**

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्र | सुरु करण्यात आलेला दिनांक व वर्ष | अपर आयुक्त कार्यालय | प्रकल्प कार्यालय | तालुका | जिल्हा | अभ्यासक्रमाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा कोटगुल | दि. १४/०८/१९९७ | नागपूर | गडचिरोली | कोरची | गडचिरोली | १. इलेक्ट्रिशियन<br>२.ऑईलइंजिन दुरुस्ती/मोटार मॅकॅनिक<br>३. घड्याळ दुरुस्ती |
| २. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा कसनसुर | | | भामरागड | भामरागड | गडचिरोली | १. इलेक्ट्रिशियन<br>२.ऑईल इंजिन दुरुस्ती<br>३. रेडीओट्रान्झीस्टरदुरुस्ती |
| ३. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा विनवळ | | ठाणे | जव्हार | जव्हार | पालघर | १. इलेक्ट्रिशन<br>२. ऑईल इंजिन/ मोटाररिपेअरींग<br>३.मोटार मॅकॅनिक<br>४.टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५.गवंडी काम<br>६.प्लास्टिक कामे |
| ४. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा पाथरज | | | पेण | कर्जत | रायगड | १. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>२. इलेक्ट्रिशन<br>३. मोटार मॅकॅनिक<br>४. गवंडी काम<br>५. सुतार काम |
| ५. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, गोहे | दि. ३०/०१/२००४ | | घोडेगाव | आंबेगाव | पुणे | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| ६. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, पळसन | | नाशिक | कळवण | सुरगणा | नाशिक | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| ७. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, भांगरापाणी | | | तळोदा | अक्कलकुंवा | नंदुरबार | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| ८. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, केळीरूमणवाडी/ मावेशी | | | राजूर | अकोले | अहमदनगर | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |

(पुढील पानावर)

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्र | सुरु करण्यात आलेला दिनांक व वर्ष | अपर आयुक्त कार्यालय | प्रकल्प कार्यालय | तालुका | जिल्हा | अभ्यासक्रमाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, वाघझिरा | | नाशिक | यावल | यावल | जळगाव | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| १०. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, कापरा | | | पांढरकवडा | बाभूळगाव | यवतमाळ | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| ११. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, सारखणी | | अमरावती | किनवट | किनवट | नांदेड | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| १२. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, राणीगाव/ सावलीखेडा | दि. ३०/०१/२००४ | | धारणी | धारणी | अमरावती | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| १३. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, कवडस | | | नागपूर | हिंगणा | नागपूर | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| १४. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, कडीकसा | | नागपूर | देवरी | देवरी | गोंदिया | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |
| १५. | शासकीय पोस्ट बेसिकआश्रमशाळा, देवाडा/रूपापेठ | | | चंद्रपूर | राजुरा | चंद्रपूर | १. इलेक्ट्रिशन/ मोटाररिपेअरींग<br>२. डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक<br>३. गवंडी काम/ सुतार काम<br>४. टी.व्ही. व रेडीओरिपेअरींग<br>५. शिवणकाम |

(स्त्रोत –दि. १४/०८/१९९७ व दि. ३०/०१/२००४ या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये)

# प्रकरण दुसरे

# मूल्यमापनाची कार्यपद्धती

## २.१. मूल्यमापन अभ्यासासाठी गठीत समिती :

पोस्ट बेसिक आश्रमशाळांतील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांचे मूल्यमापन करण्यासाठी शासनाने दि. ०१/१२/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला. त्यानुसार मूल्यमापन अभ्यासासाठी शासन निर्णय क्र. व्यशि-२०२०/प्र.क्र.३८/का.९ दि.०१/१२/२०२० अन्वये आदिवासी विकास विभागामार्फत पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली:

| अ.क्र. | पदनाम | समितीवरील पद |
|---|---|---|
| १. | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| २. | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | सदस्य |
| ३. | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, अमरावती | सदस्य |
| ४. | सह आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक | सदस्य |
| ५. | प्रकल्प अधिकारी, एकात्मिकआदिवासी विकास प्रकल्प, राजूर/नागपूर/नाशिक/किनवट/जव्हार | सदस्य |
| ६. | सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | सदस्य सचिव |

## २.२. समितीची कार्यकक्षा :

शासनाने शासन निर्णय क्र. व्यशि-२०२०/प्र.क्र.३८/का.९ दि.०१/१२/२०२० अन्वये गठीत केलेल्या समितीने खालील मुद्यांच्या अनुषंगाने अभ्यास करून शिफारशी करणे अपेक्षित आहे.

१) सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन करून ती चालू ठेवणे किंवा बंद करणेबाबत शिफारस करणे.

२) सदर केंद्र चालू ठेवायचे असल्यास त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करून अधिक सक्षमपणे कशी चालविता येतील याबाबत शिफारस करणे.

३) सदर केंद्र बंद करावयाची झाल्यास तेथील साधनसामुग्री व अन्य बाबींचा कशाप्रकारे वापर करता येईल व तेथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे अन्य ठिकाणी समायोजन करता येईल किंवा कसे याबाबत शिफारस करणे.

### २.३. मूल्यमापनाचे उद्दिष्टे :

शासनाने गठीत समितीस निर्देशित केलेल्या कार्यकक्षेनुसार मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१) पोस्ट बेसिकआश्रमशाळा संलग्नित व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजनेच्या अंमलबजावणीचा व त्यातून साध्य झालेल्या उद्दिष्टांचा अभ्यास करणे

२) पोस्ट बेसिक आश्रमशाळा संलग्नित व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजनेच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

३) पोस्ट बेसिकआश्रमशाळा संलग्नित व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजनेच्या फलनिष्पत्तीचा अभ्यास करणे.

४) पोस्ट बेसिकआश्रमशाळा संलग्नित व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचा अभ्यास करणे.

५) पोस्ट बेसिकआश्रमशाळा संलग्नित व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना अधिक सक्षम कशाप्रकारे करता येईल यासंबंधी उपाययोजना सुचविणे किंवा उपरोक्त मुद्द्यांच्या आधारे सदर योजना पुढे चालू ठेवणे उपयुक्त नसल्यास तेथील साधनसामुग्री व कंत्राटी कर्मचारी यांचे समायोजन कसे करून घेता येईल याबाबत उपाययोजना सुचविणे.

### २.४. मूल्यमापनाची पद्धती :

शासकीय पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र या योजनेच्या मूल्यमापन अभ्यासासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यरत असलेली सर्व (एकुण – १५ ) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय व त्यांचे अंतर्गत सुरु असलेल्या सर्व (एकूण – १५ ) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची मूल्यमापन अभ्यासासाठी निवड केली आहे. मूल्यमापन अभ्यासासाठीची प्राथमिक माहिती प्रश्नावली मार्फत प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांचे कडून घेण्यात आली आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या कारणास्तव प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांना प्रत्यक्ष भेट न देता ई-मेल व्दारे प्रश्नावली पाठवून माहिती घेण्यात आली आहे. प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचेकडून प्रश्नावली मार्फत मूल्यमापनसंबंधी प्राप्त/अप्राप्त झालेल्या माहितीचा तपशील पुढीलप्रमाणे –

**तक्ता क्र. ५**

| अ.क्र. | माहिती प्राप्त/अप्राप्त | प्रकल्प कार्यालय | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र |
|---|---|---|---|
| १. | प्राप्त | पांढरकवडा, किनवट, धारणी, कळवण, तळोदा, राजूर, यावल, पेण व जव्हार | कोटगुल, कसनसूर, पळसन, भांगरापाणी, केळीरुम्हणवाडी (मवेशी), कापरा, सारखणी, सावलीखेडा, कवडस, कडीकसा, पाथरज व गोहे |
| २. | अप्राप्त | गडचिरोली, भामरागड, नागपूर, देवरी, चंद्रपूर व घोडेगाव | वाघझिरा, देवडा/रुपापेठ, विनवळ |

सदर योजनेच्या मूल्यमापन अभ्यासासाठी सर्व अपर आयुक्त कार्यालय (ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर) व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यरत असलेली सर्व (एकूण – १५ ) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून अभिप्राय घेण्यात आले आहे.

प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांनी प्रश्नावली मध्ये भरून दिलेली माहिती तसेच अपर आयुक्त कार्यालय व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून घेण्यात आलेले अभिप्रायाच्या आधारे माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढून शिफारसी सुचविण्यात आलेल्या आहेत.

# प्रकरण तिसरे

# माहितीचे विश्लेषण

## ३.१. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीचे विश्लेषण :

### ३.१.१. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून प्रश्नावली मार्फत आलेल्या माहितीचे विश्लेषण :

व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांच्या मूल्यमापन अभ्यासासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून प्रश्नावलीच्या मार्फत माहिती घेण्यात आली आहे. कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या कारणास्तव व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांना प्रत्यक्ष भेट न देता ई-मेल व्दारे प्रश्नावली पाठवून माहिती घेण्यात आली आहे. एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी ३ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची (वाघझिरा, देवडा/रुपापेठ, विनवळ) माहिती आलेली नसल्याने उपलब्ध झालेल्या १२ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी (कोटगुल, कसनसूर, पळसन, भांगरापाणी, केळीरुम्हणवाडी (मवेशी), कापरा, सारखणी, सावलीखेडा, कवडस, कडीकसा, पाथरज व गोहे) पाठवलेल्या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे विश्लेषण करण्यात आले आहे.

**१) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची सुरुवात झाल्यापासून आजतगायत बाब निहाय झालेल्या खर्चाचा तपशील :**

**तक्ता क्र. ६**

| अ. क्र. | वर्ष | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/ कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतना वरील एकूण खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९७-९८ | - | - | - | - | कोणत्याच व्यवसाय प्रशिक्षण केंद्राने माहिती उपलब्ध करून दिली नाही |
| २ | १९९८-९९ | - | - | - | - | |
| ३ | १९९९-०० | - | - | - | - | |
| ४ | २०००-०१ | - | - | - | - | |
| ५ | २००१-०२ | - | - | - | - | |
| ६ | २००२-०३ | १९२०८८ | २९७६९३ | २०३७९५ | ६९३५७६ | केवळ कसनसूर येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्राने माहिती उपलब्ध करून दिली आहे |
| ७ | २००३-०४ | १९५८६० | ९७७४५ | ९७७४५ | ३९१३५० | |
| ८ | २००४-०५ | ७३८३३० | ११०४७०६ | ६४२१४९ | २४८५१८५ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, भांगारापानी, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून अपूर्ण माहिती प्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून अपूर्ण माहिती प्राप्त |

(पुढील पानावर)

| अ. क्र. | वर्ष | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/ कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतना वरील एकूण खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | २००५-०६ | १२४७०२० | ४०३८०८ | ९४३७६६ | २५९४५९४ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, पाथरज, भांगारापानी व सारखणी येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - केवळ कडीकसा व सारखणी केंद्रांकडून माहिती प्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कसनसूर, कोटगुल, भांगरापानी, सारखणी, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १० | २००६-०७ | १५२८२७९ | २३६८३५ | १०२२८२१ | २७८७९३५ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, पाथरज, भांगारापानी व सारखणी येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - पळसन, केळीरुमणवाडी, कोटगुल, भांगरापानी, कडवस, सावलीखेडा, सारखणी, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| ११ | २००७-०८ | २७३३१४१ | ७७७१३७ | ९१७०७३ | ४४२७३५१ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, भांगारापानी व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - पळसन, केळीरुमणवाडी, कोटगुल, भांगरापानी, कडवस, सावलीखेडा, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १२ | २००८-०९ | १६८०१८३ | १५२३२१ | ११४१८९० | २९७४३९४ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, कापरा, भांगारापानी, व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - पळसन, केळीरुमणवाडी, कोटगुल, भांगरापानी, कडवस, सावलीखेडा, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त |

(पुढील पानावर)

| अ. क्र. | वर्ष | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/ कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतना वरील एकूण खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | २००९-१० | १२५४६६१ | १०८६०६ | १०५४५४९ | २४१७८१६ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, भांगारापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - पळसन, केळीरुमणवाडी, कोटगुल, भांगरापानी, कडवस, सावलीखेडा, सारखणी, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १४ | २०१०-११ | १८९१६८३ | १८५९७३ | १२६७१४३ | ३३४४७९९ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, भांगारापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - पळसन, कसनसूर, केळीरुमणवाडी, कोटगुल, भांगरापानी, कडवस, सावलीखेडा, सारखणी, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १५ | २०११-१२ | ५६३३९६४ | १६२४११० | १९९४०७० | ९२५२१४४ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, भांगारापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - पळसन, कसनसूर, केळीरुमणवाडी, कोटगुल, कडवस, भांगरापानी, सावलीखेडा, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १६ | २०१२-१३ | २८१०६६७ | - | १८२८४६९ | ४६३९१३६ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, भांगारापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |

(पुढील पानावर)

| अ. क्र. | वर्ष | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/ कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतना वरील एकूण खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | २०१३-१४ | २९२१११३८ | - | १५८२४३० | ४५०३५६८ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, कापरा, भांगरापानी व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १८ | २०१४-१५ | ३२७०२९२ | ४९११४५ | १६६५१९८ | ५४२६६३५ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, कापरा, भांगरापानी व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - केवळ कडीकसा येथील माहिती प्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| १९ | २०१५-१६ | ५००६१२६ | - | १५८३९३९ | ६५९००६५ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| २० | २०१६-१७ | ४६३६०८६ | १७६५३२ | २०१३९९८ | ६८२६६१६ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल व कापरा येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - केवळ पाथरज येथील माहिती प्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सारखणी व कापरा येथील माहिती अप्राप्त |
| २१ | २०१७-१८ | ४४५९०७५ | - | १३६१७६५ | ५८२०८४० | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, सारखणी व कापरा येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सावलीखेडा, सारखणी व कापरा येथील माहिती अप्राप्त |

(पुढील पानावर)

| अ. क्र. | वर्ष | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/ कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतना वरील एकूण खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २०१८-१९ | ४२९६६३७ | - | १४१९८३४ | ५७१६४७१ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सावलीखेडा, सारखणी, कापरा व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| २३ | २०१९-२० | ६०८३६७१ | - | ११०२४०२ | ७१८६०७३ | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - कोटगुल, कापरा, भांगरापानी, सावलीखेडा, सारखणी, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - कोटगुल, भांगरापानी, सावलीखेडा, सारखणी, कापरा, गोहे व पाथरज येथील माहिती अप्राप्त |
| २४ | २०२०-२१ | ६२८०५० | - | - | ६२८०५० | **कर्मचाऱ्यांचे मानधन माहिती** - केवळ कडीकसा येथील माहिती प्राप्त<br>**साधनसामुग्रीचा खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त<br>**विद्यावेतनावरील खर्चाची माहिती** - सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती अप्राप्त |
| | **एकूण** | **५०८१९००३** | **५२६११७३** | **२१५४१४९६** | **७७६२१६७२** | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : बाब निहाय अप्राप्त असलेल्या माहितीचा शेरा तक्त्यात देण्यात आलेला आहे.

**२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरुवात झाल्यापासून आजतगायत अभ्यासक्रम निहाय व वर्ष निहाय प्रवेश घेतलेल्या व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या :**

**तक्ता क्र. ७**

| अ.क्र. | वर्ष | अभ्यासक्रम | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रिशन/ मोटार रिपेअरींग | | डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक | | गवंडी काम | | टी.व्ही./ रेडीओ रिपेअरींग | | शिवणकाम | | सुतार काम | | ब्युटीपार्लर | | इतर | | एकूण एकंदर | |
| | | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | **एकूण प्रवेश** | **एकूण उत्तीर्ण** |
| १ | ११९७-९८ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २८ | २८ | २८ | २८ |
| २ | १९९८-९९ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २३ | २३ | २३ | २३ |
| ३ | १९९९-०० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १७ | १७ | १७ | १७ |
| ४ | २०००-०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २८ | २८ | २८ | २८ |
| ५ | २००१-०२ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| ६ | २००२-०३ | १७ | १७ | १७ | १७ | १६ | १६ | - | - | - | - | - | - | - | - | ४२ | ४२ | ९२ | ९२ |
| ७ | २००३-०४ | १७ | १५ | १७ | १५ | १६ | १४ | - | - | - | - | - | - | - | - | ४९ | ४९ | ९९ | ९३ |
| ८ | २००४-०५ | ३०२ | २०४ | १५१ | १२५ | ३६ | २९ | १०९ | १०९ | ९८ | ८९ | ५३ | ५० | ० | ० | ४७ | ४७ | ७९६ | ६५३ |
| ९ | २००५-०६ | २३९ | २१९ | १८१ | १४५ | ३६ | ३३ | १२४ | १२२ | १२८ | १०५ | ७४ | ६५ | ० | ० | ४४ | ४४ | ८२६ | ७३३ |
| १० | २००६-०७ | २२५ | २०४ | १७४ | १४९ | ४६ | ४६ | १०७ | १०६ | १२१ | १०६ | ९६ | ८५ | ० | ० | १७ | १७ | ७८६ | ७१३ |
| ११ | २००७-०८ | २१३ | १९२ | १६६ | १४५ | ४६ | ४६ | ११७ | ११६ | १०६ | ९३ | ७६ | ७१ | ० | ० | ५० | ५० | ७७४ | ७१३ |
| १२ | २००८-०९ | १८७ | १७२ | १६३ | १३० | ४६ | ४५ | ९४ | ९४ | १२९ | १०३ | ६१ | ५७ | ० | ० | २७ | २७ | ७०७ | ६२८ |
| १३ | २००९-१० | १९२ | १७२ | १५५ | १२४ | ४३ | ४१ | ९५ | ९१ | ११२ | ८३ | ५६ | ५५ | ० | ० | ६५३ | ५६६ | १३०६ | ११३२ |
| १४ | २०१०-११ | १८६ | १६३ | १३५ | ११५ | ३५ | ३५ | ७३ | ७३ | ९१ | ७४ | ५८ | ५८ | ० | ० | ५७८ | ५१८ | ११५६ | १०३६ |
| १५ | २०११-१२ | १६९ | १६३ | १३७ | १२३ | ३५ | ३५ | १०१ | ९८ | ८५ | ७८ | ५३ | ५३ | ० | ० | ६१ | ६१ | ६४१ | ६११ |
| १६ | २०१२-१३ | १६८ | १५१ | १४४ | ११८ | ४४ | ४२ | १०७ | १०१ | ९३ | ८५ | ६१ | ६० | ० | ० | ५१ | ५१ | ६६८ | ६०८ |
| १७ | २०१३-१४ | १३९ | १२५ | १५६ | १४५ | ४० | ४० | १०८ | १०१ | १०३ | ८७ | ८४ | ६१ | ० | ० | ५४ | ५४ | ६८४ | ६१३ |
| १८ | २०१४-१५ | १८९ | १६९ | १४७ | ११७ | ३३ | ३३ | ११५ | ९७ | १०९ | ८८ | ६५ | ५२ | ४१ | ३४ | ४५ | ४५ | ७४४ | ६३५ |
| १९ | २०१५-१६ | १८५ | १७० | २०१ | १६१ | ३२ | ३० | १०१ | ९८ | १६७ | १२२ | ११९ | १०१ | २९ | २७ | ६१ | ६१ | ८९५ | ७७० |
| २० | २०१६-१७ | १९५ | १७७ | २०० | १६१ | ३७ | ३७ | १०४ | १०१ | १४० | ११० | १२४ | ९९ | २३ | २० | ७२ | ७२ | ८९५ | ७७७ |
| २१ | २०१७-१८ | १९९ | १४७ | १७२ | १२२ | ४० | ३९ | ११२ | १०० | १३० | ११० | १२१ | १०४ | २९ | २४ | ६१ | ६१ | ८६४ | ७०७ |
| २२ | २०१८-१९ | १४७ | १३१ | १५१ | १२० | ३९ | ३६ | १३१ | १०५ | १११ | १०२ | १३० | ९५ | ३९ | ३२ | ० | ० | ७४८ | ६२१ |
| २३ | २०१९-२० | ३४२ | ३१० | ३१३ | २८२ | २५६ | २४९ | २६ | २२ | ६० | ३५ | ३९ | ३४ | २७ | ९ | ० | ० | १०६३ | ९४१ |
| **एकूण** | | **३३११** | **२९०१** | **२७८०** | **२३१४** | **८७६** | **८४६** | **१६२४** | **१५३४** | **१७८३** | **१४७०** | **१२७०** | **११००** | **१८८** | **१४६** | **२०४०** | **१८९३** | **१३८७२** | **१२२०४** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप: एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी ३ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची (वाघझिरा, देवडा/रुपापेठ, विनवळ) माहिती आलेली नाही


**३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पुढील तीन महिने नगरात अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्धतेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ८**

| अ. क्र. | व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३ | २५.०० % |
| २ | नाही | ७ | ५८.३३ % |
| ३ | काही प्रमाणात | १ | ८.३३३ % |
| ४ | सांगता येत नाही | १ | ८.३३३ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. १**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पुढील तीन महिने नगरातील अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्धतेबाबतची माहिती दर्शविली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ३ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पुढील तीन महिने नगरातील अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध करून देतात, ७ (५८.३३ %)

प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर नगरातील अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध होत नाही असे सांगितले, १ (८.३३३ %) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर नगरातील अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी काही प्रमाणात उपलब्ध होते असे सांगितले व १ (८.३३३ %) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर नगरातील अथवा उपनगरात सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध होणेबाबत सांगता येत नाही असे सांगितले.


**४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी विद्यार्थी संख्या उपलब्धतेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ९**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होते का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ६६.६७ % |
| २ | नाही | ४ | ३३.३३ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. २**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी विद्यार्थी संख्या उपलब्धत होणेबाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ८ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होते व ४ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नाही असे आढळते.

### ५) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात आवश्यक तेवढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याची कारणे :

**तक्ता क्र. १०**

| अ.क्र. | कारणे | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नोकरी मिळत नाही | ४ | ६६.६७ % |
| २ | कर्ज मिळत नाही | २ | ३३.३३ % |
| ३ | प्रमाणपत्राला व अभ्यासक्रमाला तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही | ३ | ५०.०० % |
| ४ | प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे | २ | ३३.३३ % |
| ५ | अनुभवी शिक्षक/औद्यगिक वसाहत/प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध होत नाहीत | २ | ३३.३३ % |
| ६ | भौगोलिक दुर्गमता, साधन सामुग्रीची कमतरता इ. | ३ | ५०.०० % |
| ७ | सदर प्रशिक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता आढळून येते/विद्यार्थी मिळत नाही/विद्यार्थी मध्येच सोडून जातात | २ | ३३.३३ % |
| | **एकूण** | **६** | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : १) उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**२) तक्ता क्र. ९ मध्ये एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ४ प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नाही असे सांगितले परंतु या प्रश्नाचा प्रतिसाद ६ प्रशिक्षण केंद्रांनी दिला असल्याने त्याआधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.**

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याची कारणांची माहिती दिली आहे. माहितीवरून असे समजते कि, एकूण ६ प्रशिक्षण केंद्रांपैकी ४ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणामुळे नोकरी मिळत नाही असे सांगितले, २ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणामुळे व्यवसायासाठी बँकेकडून कर्ज मिळत नाही असे सांगितले, ३ (५०.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणाच्या प्रमाणपत्राला व अभ्यासक्रमाला तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही असे सांगितले, २ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे असे सांगितले, २ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षण घेण्यासाठी अनुभवी शिक्षक नाही/जवळ औद्यगिक वसाहत नाही/प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध होत नाहीत असे सांगितले, ३ (५०.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षण भौगोलिक दृष्ट्या दुर्गम भागात आहे तसेच प्रशिक्षणासाठी साधन सामुग्रीची कमतरता आहे असे सांगितले व २ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता आढळून येते/विद्यार्थी मिळत नाही/विद्यार्थी मध्येच सोडून जातात असे सांगितले.


**६) व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थींच्या उत्सुकतेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ११**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी उत्सुक आहेत का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ६६.६७ % |
| २ | नाही | ४ | ३३.३३ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ३**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थींच्या उत्सुकतेबाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ८ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी विद्यार्थी/प्रशिक्षणार्थी व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी उत्सुक असतात असे सांगितले व ४ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी विद्यार्थी/प्रशिक्षणार्थी व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी उत्सुक नसतात असे सांगितले.

## ७) व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी उत्सुक नसल्याची कारणे :

**तक्ता क्र. १२**

| अ.क्र. | कारणे | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नोकरी मिळत नाही | ५ | १००.०० % |
| २ | कर्ज मिळत नाही | २ | ४०.०० % |
| ३ | प्रमाणपत्राला व अभ्यासक्रमाला तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही | २ | ४०.०० % |
| ४ | प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे | ३ | ६०.०० % |
| ५ | अनुभवी शिक्षक नाहीत | १ | २०.०० % |
| ६ | साधन सामुग्रीची कमतरता | १ | २०.०० % |
| ७ | प्रशिक्षणासाठी विद्यार्थी मिळत नाही/विद्यार्थी मध्येच सोडून जातात | १ | २०.०० % |
| | **एकूण** | **५** | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : १) उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**२) तक्ता क्र. ११ मध्ये एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ४ प्रशिक्षण केंद्रात व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी उत्सुक नसतात असे सांगितले परंतु या प्रश्नाचा प्रतिसाद ५ प्रशिक्षण केंद्रांनी दिला असल्याने त्याआधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.**

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी उत्सुक नसल्याची कारणांबाबतची माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, एकूण ५ प्रशिक्षण केंद्रांपैकी सर्व ५ (१००.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर व्यवसाय प्रशिक्षणामुळे नोकरी मिळत नाही असे सांगितले आहे, २ (४०.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणामुळे व्यवसायासाठी कर्ज मिळत नाही असे सांगितले, २ (४०.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षणाच्या प्रमाणपत्राला व अभ्यासक्रमाला तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही असे सांगितले, ३ (६०.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे असे सांगितले, १ (२०.०० %) प्रशिक्षण केंद्राने सदर व्यवसाय प्रशिक्षणासाठी अनुभवी शिक्षक नाहीत असे सांगितले, १ (२०.०० %) प्रशिक्षण केंद्राने सदर व्यवसाय प्रशिक्षणासाठी साधन सामुग्रीची कमतरता भासते असे सांगितले व १ (२०.०० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षणासाठी विद्यार्थी मिळत नाही/विद्यार्थी मध्येच सोडून जातात असे सांगितले.

**८) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभ्यासक्रमावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षेबद्दलची माहिती :**

**तक्ता क्र. १३**

| अ.क्र. | प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभ्यासक्रमावर परीक्षा घेतली जाते का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | १००.०० % |
| २ | नाही | ० | ०.०० % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभ्यासक्रमावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षेबद्दलची माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी सर्वच १२ (१००.०० %) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभ्यासक्रमावर परीक्षा घेतली जाते.

**९) प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणामुळे मिळणाऱ्या रोजगाराबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. १४**

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या मागील तीन वर्षातील एकूण विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांना प्रशिक्षणामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रोजगार उपलब्ध झाला | २ | १६.६७ % |
| २ | रोजगार उपलब्ध झाला नाही | ६ | ५०.०० % |
| ३ | माहिती नाही | २ | १६.६७ % |
| ४ | माहिती उपलब्ध नाही | १ | ८.३३ % |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणामुळे मागील तीन वर्षात मिळालेल्या रोजगाराबाबत माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्राने मागील

तीन वर्षात प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने मागील तीन वर्षात प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी १५७ विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे असे सांगितले, ६ (५०.०० %) प्रशिक्षण केंद्राने मागील तीन वर्षात प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या कोणत्याच विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध झाला नाही असे सांगितले, २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्राने याबाबत माहिती नाही असा प्रतिसाद दिला, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने याबाबत माहिती प्रशिक्षण केंद्राकडे उपलब्ध नाही असे सांगितले व १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने याबाबत प्रतिसाद दिला नाही.

**१०) प्रशिक्षण केंद्रात चालू अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर व्यवसाय अभ्यासक्रम मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेबाबत :**

**तक्ता क्र. १५**

| अ.क्र. | व्यवसाय अभ्यासक्रम | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ड्रेस मेकिंग | २ | १६.६७ % |
| २ | संगणक/माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण | ५ | ४१.६७ % |
| ३ | ब्युटीपार्लर प्रशिक्षण | १ | ८.३३ % |
| ४ | अन्न तंत्रज्ञान | १ | ८.३३ % |
| ५ | हॉटेल व्यवस्थापन | १ | ८.३३ % |
| ६ | दुग्ध व्यवसाय | १ | ८.३३ % |
| ७ | शेळी पालन | १ | ८.३३ % |
| ८ | LCD, LED रिपेरिंग | १ | ८.३३ % |
| ९ | मोबाईल रिपेरिंग | २ | १६.६७ % |
| १० | वेल्डिंग | १ | ८.३३ % |
| ११ | नळ फिटिंग | १ | ८.३३ % |
| १२ | दुचाकी/चारचाकी दुरुस्ती (Automobile) | १ | ८.३३ % |
| १३ | प्रतिसाद नाही | २ | १६.६७ % |
| | एकूण | १२ | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.
टीप : उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

वरील तक्त्यामध्ये प्रशिक्षण केंद्रात चालू अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर व्यवसाय अभ्यासक्रम मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेबाबतची माहिती दर्शविली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी

ड्रेस मेकिंग प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, ५ (४१.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी संगणक/माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने ब्युटीपार्लरच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने अन्न तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने हॉटेल व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने दुग्ध व्यवसायाच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने शेळी पालनाच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण LCD, LED रिपेरिंगसंबंधीच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी मोबाईल रिपेरिंगच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण वेल्डिंगच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण नळ फिटिंगच्या प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण दुचाकी/चारचाकी दुरुस्ती (Automobile) प्रशिक्षणामुळे मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल असे सांगितले व २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी यासंबंधी प्रतिसाद दिला नाही.


**११) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. १६**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करावे असे आपणास वाटते का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३ | २५.०० % |
| २ | नाही | ७ | ५८.३३ % |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | १६.६७ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ४**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ३ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करण्यात यावे असे सांगितले, ७ (५८.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करू नये असे सांगितले व २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी याबाबत प्रतिसाद दिला नाही.

## १२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची कारणे :

**तक्ता क्र. १७**

| अ.क्र. | कारणे | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार/नोकरी मिळत नाही/विद्यार्थी स्वावलंबी होत नाही | ३ | ७५.०० % |
| २ | कर्ज मिळत नाही | १ | २५.०० % |
| ३ | प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांना मानधन वेळेवर मिळत नाही | १ | २५.०० % |
| ४ | प्रशिक्षण अभ्यासक्रमास तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही | १ | २५.०० % |
| ५ | अनुभवी शिक्षक/साधनसामुग्रीची कमतरता | २ | ५०.०० % |
| ६ | प्रशिक्षण केंद्रांचे मूल्यमापन होत नाही | १ | २५.०० % |
| | **एकूण** | **४** | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : १) उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**२) तक्ता क्र. १६ मध्ये एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ३ प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करण्यात यावे असा प्रतिसाद दिला आहे परंतु प्रशिक्षण केंद्र बंद करण्याची कारणे ४ प्रशिक्षण केंद्रांनी दिला असल्याने त्याआधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.**

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करणेबाबतची व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी सांगितलेल्या कारणांची माहिती दिली आहे. माहितीवरून असे समजते कि, एकूण ४ प्रशिक्षण केंद्रांपैकी ३ (७५.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी सदर प्रशिक्षण बंद करणेबाबत प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार/नोकरी मिळत नाही/विद्यार्थी स्वावलंबी होत नाही हे कारण सांगितले आहे, १ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण बंद करणेबाबत या प्रशिक्षणामुळे व्यवसायास कर्ज मिळत नाही असे सांगितले, १ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण बंद करणेबाबत प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांना मानधन वेळेवर मिळत नाही असे सांगितले, १ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण बंद करणेबाबत प्रशिक्षण अभ्यासक्रमास तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही असे सांगितले, २ (५०.०० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण बंद करणेबाबत प्रशिक्षण केंद्रावर अनुभवी शिक्षक/साधनसामुग्रीची कमतरता आहे असे सांगितले व १ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण बंद करणेबाबत प्रशिक्षण केंद्रांचे मूल्यमापन होत नाही असे सांगितले.

## १३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद न करणेबाबतची कारणे :

**तक्ता क्र. १८**

| अ.क्र. | कारणे | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अल्प प्रमाणात परंतु स्वयं रोजगार उपलब्ध करून देणारे साधन | ६ | ७५.०० % |
| २ | आदिवासी डोंगराळ भागात अल्प-कुशल कारागीर निर्माण होण्यास मदत होते | ४ | ५०.०० % |
| ३ | अति-दुर्गम भागात व्यवसाय शिक्षणाचे इतर पर्याय (उदा. Polytechnic कॉलेज) उपलब्ध नाही | २ | २५.०० % |
| ४ | अति-दुर्गम भागात व्यवसाय प्रशिक्षणाचे इतर पर्याय उपलब्ध नसल्याने व्य.प्र. केंद्रास विद्यार्थी उपलब्ध होतात | १ | १२.५० % |
| ५ | शिवणकाम व ब्युटीपार्लर या कौशल्यांमुळे युवतींना स्वयंरोजगार प्राप्त होतो | २ | २५.०० % |
| ६ | अभ्यासक्रम चांगला आहे परंतु कालावधी कमी आहे | १ | १२.५० % |
| ७ | सदर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र मिळावे | १ | १२.५० % |
| | **एकूण** | **८** | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : १) उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**२) तक्ता क्र. १६ मध्ये एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ७ प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करू नये असा प्रतिसाद दिला आहे परंतु प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याची कारणे ८ प्रशिक्षण केंद्रांनी दिला असल्याने त्याआधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.**

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद न करणेबाबतची व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी सांगितलेल्या कारणांची माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, एकूण ८ प्रशिक्षण केंद्रांपैकी ६ (७५.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याबाबत सदर प्रशिक्षण अल्प प्रमाणात परंतु स्वयं रोजगार उपलब्ध करून देणारे साधन आहे असे सांगितले, ४ (५०.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याबाबत सदर प्रशिक्षणामुळे आदिवासी डोंगराळ भागात अल्प-कुशल कारागीर निर्माण होण्यास मदत होते असे सांगितले, २ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याबाबत अति-दुर्गम भागात व्यवसाय शिक्षणाचे इतर पर्याय (उदा. Polytechnic कॉलेज) उपलब्ध नाही असे सांगितले, १ (१२.५० %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याबाबत अति-दुर्गम भागात व्यवसाय प्रशिक्षणाचे इतर पर्याय उपलब्ध नसल्याने व्य.प्र. केंद्रास विद्यार्थी उपलब्ध होतात असे

सांगितले, २ (२५.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याबाबत सदर प्रशिक्षणामुळे शिवणकाम व ब्युटीपार्लर या कौशल्यांमुळे युवतींना स्वयंरोजगार प्राप्त होतो असे सांगितले, १ (१२.५० %) प्रशिक्षण केंद्राने सदर प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम चांगला आहे परंतु कालावधी कमी आहे असे सांगितले व १ (१२.५० %) प्रशिक्षण केंद्राने सदर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र मिळावे असे सांगितले.


**१४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करणेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. १९**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करता येऊ शकतो का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९ | ७५.०० % |
| २ | नाही | १ | ८.३३ % |
| ३ | सांगता येत नाही | २ | १६.६७ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ५**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करणेबाबतची माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या

विश्लेषणावरून दिसते कि, एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ९ (७५.०० %) प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करता येऊ शकतो असे सांगितले, १ (८.३३ %) प्रशिक्षण केंद्राने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करता येऊ शकत नाही असे सांगितले व २ (१६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी याबाबत सांगता येत नाही असा प्रतिसाद दिला.

**१५) कंत्राटी कर्मचाऱ्यांचा इतर कामासाठी वापर करणेबाबतचे मत :**

**तक्ता क्र. २०**

| अ. क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कोणत्या कामासाठी वापर करता येऊ शकतो ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आश्रमशाळेतील इलेक्ट्रिक फिटिंग, मोटार दुरुस्ती, नळ फिटिंग, सुतारकाम, तारकाम व शिवणकामाशी संबंधित कामे करून घेणे | ६ | ६६.६७ % |
| २ | आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय प्रशिक्षण तासिका घेणे/ व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमांची ओळख करून देणे | ४ | ४४.४४ % |
| ३ | आविवी अंतर्गत वर्ग ४ च्या पदांवर काम करणे - उदा. सुरक्षारक्षक, स्वयंपाकी, कामाठी ई. | २ | २२.२२ % |
| ४ | लेखा लिपिक कामासाठी | १ | ११.११ % |
| | **एकूण** | **९** | |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : १) उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**२) तक्ता क्र. १९ मध्ये एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ९ प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण** केंद्रात **कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा इतर कामासाठी वापर करता येऊ शकतो असे मत नोंदविले असल्याने त्याआधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.**

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा इतर कामासाठी वापर करणेबाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे आढळते कि, एकूण ९ प्रशिक्षण केंद्रापैकी ६ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी कंत्राटी कर्मचारी आश्रमशाळेतील इलेक्ट्रिक फिटिंग, मोटार दुरुस्ती, नळ फिटिंग, सुतारकाम, तारकाम व शिवणकामाशी संबंधित कामे करू शकतात असे सांगितले, ४ (४४.४४ %) प्रशिक्षण केंद्रांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय प्रशिक्षण तासिका घेणे/ व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमांची ओळख करून देणे या स्वरुपाची कामे करून घेता येईल असे सांगितले, २ (२२.२२ %) प्रशिक्षण केंद्रांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून

आदिवासी विकास विभाग अंतर्गत वर्ग ४ च्या पदांवर काम करणे - उदा. सुरक्षारक्षक, स्वयंपाकी, कामाठी ई.स्वरुपाची कामे करू शकतात असे सांगितले व १ (११.११ %) प्रशिक्षण केंद्राने कंत्राटी कर्मचारी लेखा लिपिक कामासाठी वापरता येऊ शकतात असे सांगितले आहे.


**१६) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवालाबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. २१**

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल घेण्यात येतो का ? | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७ | ५८.३३ % |
| २ | नाही | ५ | ४१.६७ % |
| | **एकूण** | **१२** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ६**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवालाबाबतची माहिती दिली आहे. माहिती वरून असे आढळते कि, एकूण १२ प्रशिक्षण केंद्रांपैकी ७ (५८.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल घेण्यात येतो असे सांगितले व ५ (४१.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल घेण्यात येत नाही असे सांगितले.

### ३.१.२. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र येथे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती :

### अ) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व पदनाम निहाय कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती :

**तक्ता क्र. २२**

| अ. क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | पदनाम | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गट निदेशक | शिल्प निदेशक | लेखापाल | रोखपाल | वर्कशॉप सहाय्यक | कार्यशाळा परिचर | शिपाई | एकूण |
| १ | कोटगुल | १ | ३ | १ | - | २ | - | २ | **९** |
| २ | कसनसूर | १ | १ | १ | - | १ | - | २ | **६** |
| ३ | विनवळ | १ | ६ | १ | - | २ | - | २ | **१२** |
| ४ | पाथरज | १ | २ | - | १ | २ | - | २ | **८** |
| ५ | गोहे | - | ५ | - | - | - | - | - | **५** |
| ६ | पळसण | १ | ६ | १ | - | १ | - | १ | **१०** |
| ७ | भांगरापाणी | १ | ४ | - | - | - | - | १ | **६** |
| ८ | केळीरुमणवाडी/मावेशी | १ | २ | १ | - | २ | - | २ | **८** |
| ९ | वाघझिरा | १ | ७ | १ | - | - | १ | २ | **१२** |
| १० | कापरा | - | ३ | - | - | - | - | - | **३** |
| ११ | सारखणी | - | ४ | - | - | - | - | - | **४** |
| १२ | राणीगाव/सावलीखेडा | - | ४ | १ | - | - | - | १ | **६** |
| १३ | कवडस | - | २ | - | - | - | - | १ | **३** |
| १४ | कडिकसा | १ | ३ | १ | - | २ | - | १ | **८** |
| १५ | देवाडा/रुपापेठ | १ | ४ | १ | - | ३ | - | १ | **१०** |
| **एकूण** | | **१०** | **५६** | **९** | **१** | **१५** | **१** | **१८** | **११०** |
| टक्केवारी | | ९.०९ % | ५०.९० % | ८.१८ % | ०.९० % | १३.६३ % | ०.९० % | १६.३६ % | १००.०० % |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व पदनाम निहाय कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये ११० कंत्राटी कर्मचारी आहेत. एकूण ११० कर्मचाऱ्यांपैकी १० (९.०९ %) कर्मचारी गट निदेशक या पदाची आहेत, ५६ (५०.९० %) कर्मचारी शिल्प निदेशक या पदाची आहेत, ९ (८.१८ %) कर्मचारी लेखापाल या पदाची आहेत, १ (०.९० %) कर्मचारी रोखपाल या पदाचा आहे, १५ (१३.६३ %) कर्मचारी वर्कशॉप सहाय्यक या पदाची आहेत, १ (०.९० %) कर्मचारी कार्यशाळा परिचर  या पदाचा आहे व १८ (१६.३६ %) कर्मचारी शिपाई  या पदाची असल्याचे दिसून येते.

**ब) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व संवर्ग निहाय कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती :**

**तक्ता क्र. २३**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | संवर्ग | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | इ.मा.व. | सामान्य | एकूण |
| १ | कोटगुल | ८ | १ | - | - | **९** |
| २ | कसनसूर | ३ | १ | २ | - | **६** |
| ३ | विनवळ | ८ | २ | १ | १ | **१२** |
| ४ | पाथरज | ७ | - | - | १ | **८** |
| ५ | गोहे | ५ | - | - | - | **५** |
| ६ | पळसण | १० | - | - | - | **१०** |
| ७ | भांगरापाणी | ६ | - | - | - | **६** |
| ८ | केळीरुमणवाडी/मावेशी | ५ | - | - | ३ | **८** |
| ९ | वाघझिरा | ६ | - | ४ | २ | **१२** |
| १० | कापरा | १ | १ | १ | - | **३** |
| ११ | सारखणी | - | ४ | - | - | **४** |
| १२ | राणीगाव/सावलीखेडा | १ | १ | ४ | - | **६** |
| १३ | कवडस | ३ | - | - | - | **३** |
| १४ | कडिकसा | ५ | - | ३ | - | **८** |
| १५ | देवाडा/रुपापेठ | ९ | - | - | १ | **१०** |
| **एकूण** | | **७७** | **१०** | **१५** | **८** | **११०** |
| टक्केवारी | | ७०.०० % | ९.०९ % | १३.६३ % | ७.२७ % | १००.०० % |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व संवर्ग निहाय कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती दर्शविली आहे. माहितीवरून असे समजते कि, एकूण ११० कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ७७ (७०.०० %) कर्मचारी अनुसूचित जमातीचे आहेत, १० (९.०९ %) कर्मचारी अनुसूचित जातीचे आहेत, १५ (१३.६३ %) कर्मचारी इतर मागासवर्गिय आहेत व ८ (७.२७ %) कर्मचारी सामान्य प्रवर्गातील आहे.

यावरून एकूण कर्मचाऱ्यांपैकी अनुसूचित जमातींच्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे आढळते.


### क) कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व वय संवर्गानुसार वर्गीकरण :

**तक्ता क्र. २४**

| अ. क्र. | पदनाम | वय संवर्ग | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **२१-२५** | **२६-३०** | **३१-३५** | **३६-४०** | **४१-४५** | **४६-५०** | **५१-५५** | **एकूण** |
| १. | कार्यशाळा परिचर | - | - | १ | - | - | - | - | **१** |
| २. | गटनिदेशक | - | - | - | - | ७ | २ | १ | **१०** |
| ३. | रोखपाल | - | - | - | १ | - | - | - | **१** |
| ४. | लेखापाल | - | १ | ३ | १ | २ | १ | १ | **९** |
| ५. | वर्कशॉप सहाय्यक | - | १ | १ | ३ | ४ | ३ | ३ | **१५** |
| ६. | शिपाई | १ | - | १ | ७ | ४ | ३ | २ | **१८** |
| ७. | शिल्पनिदेशक | २ | १ | ४ | १६ | २० | १३ | - | **५६** |
| **एकूण** | | **३** | **३** | **१०** | **२८** | **३७** | **२२** | **७** | **११०** |
| टक्केवारी | | २.७२ % | २.७२ % | ९.०९ % | २५.४५ % | ३३.६३ % | २०.०० % | ६.३६ % | १००.०० % |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ७**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व वय संवर्गानुसार वर्गीकरणनुसार माहिती दिली आहे. माहितीवरून असे समजते कि, एकूण ११० कर्मचाऱ्यांपैकी वय संवर्ग २१-२५ दरम्यान वय असणारे ३ (२.७२ %) कर्मचारी आहेत, वय संवर्ग २६-३० दरम्यान वय असणारे ३ (२.७२ %) कर्मचारी आहेत, वय संवर्ग ३१-३५ दरम्यान वय असणारे १० (९.०९ %) कर्मचारी आहेत, वय संवर्ग ३६-४० दरम्यान वय असणारे २८ (२५.४५ %) कर्मचारी आहेत, वय संवर्ग ४१-४५

दरम्यान वय असणारे ३७ (३३.६३ %) कर्मचारी आहेत, वय संवर्ग ४६-५० दरम्यान वय असणारे २२ (२०.०० %) कर्मचारी आहेत व वय संवर्ग ४१-५५ दरम्यान वय असणारे ७ (६.३६ %) कर्मचारी आहेत.

यावरून असे दिसते कि, एकूण कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ४४ (३९.९८%) कर्मचाऱ्यांचे वय ४० पेक्षा कमी आहे व ६६ (५९.९९%) कर्मचाऱ्यांचे वय ४० पेक्षा जास्त आहे.

**ड) कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व शिक्षणस्तर निहाय वर्गीकरण :**

**तक्ता क्र. २५**

| अ. क्र. | पदनाम | शिक्षणाचे स्तर | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवसाक्षर | दहावी खालील | दहावी | आय.टी. आय. | बारावी | डिप्लोमा | पदवीधर | पदव्युत्तर पदवी | एकूण |
| १. | कार्यशाळा परिचर | - | - | १ | - | - | - | - | - | **१** |
| २. | गटनिदेशक | - | - | - | - | ६ | २ | २ | - | **१०** |
| ३. | रोखपाल | - | - | - | - | १ | - | - | - | **१** |
| ४. | लेखापाल | - | - | - | - | २ | २ | ४ | १ | **९** |
| ५. | वर्कशॉप सहाय्यक | - | ३ | ५ | - | ४ | १ | २ | - | **१५** |
| ६. | शिपाई | १ | - | ९ | - | ८ | - | - | - | **१८** |
| ७. | शिल्पनिदेशक | - | - | १२ | ८ | २४ | - | ११ | १ | **५६** |
| **एकूण** | | **१** | **३** | **२७** | **८** | **४५** | **५** | **१९** | **२** | **११०** |
| टक्केवारी | | ०.९० % | २.७२ % | २४.५४ % | ७.२७ % | ४०.९० % | ४.५४ % | १७.२७ % | १.८१ % | १००.०० % |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदनाम व शिक्षणस्तर निहाय माहिती दर्शविली आहे. माहितीवरून शिक्षणाच्या स्तरामध्ये एकूण ११० कर्मचाऱ्यांपैकी नवसाक्षर असणारा कर्मचारी १ (०.९० %) आहे, दहावी खालील शिक्षण असणारे ३ (२.७२ %) कर्मचारी आहेत, इयत्ता दहावी पर्यंत शिकलेले २७ (२४.५४ %) कर्मचारी आहेत, आय.टी.आय. कोर्स शिक्षण स्तर असणारे ८ (७.२७ %) कर्मचारी आहेत, इयत्ता बारावी असणारे ४५ (४०.९० %) कर्मचारी आहेत, डिप्लोमा असणारे ५ (४.५४ %) कर्मचारी आहेत, पदवी पर्यंत शिक्षण असणारे १९ (१७.२७ %) कर्मचारी आहेत व पदव्युत्तर पदवी असणारे २ (१.८१ %) कर्मचारी आहेत.

वरील माहिती वरून एकूण कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ३१ (२८.१८ %) इतके कर्मचारी दहावी व दहावी पेक्षा कमी शिक्षण असणारे आहेत व दहावी पेक्षा जास्त शिक्षण असणारे ७९ (७१.८१ %) इतके कर्मचारी आहेत.


**इ) आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पदनाम निहाय वर्गीकरण :**

**तक्ता क्र. २६**

| अ.क्र. | संवर्ग | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गट निदेशक | ९ | १२.०० % |
| २ | शिल्प निदेशक | ५३ | ७०.६७ % |
| ३ | लेखापाल | ४ | ५.३३ % |
| ४ | कार्यशाळा परिचर | १ | १.३३ % |
| ५ | वर्कशॉप सहाय्यक | ५ | ६.६७ % |
| ६ | शिपाई | ३ | ४.०० % |
| **एकूण** | | **७५** | **१००.०० %** |

स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ८**




स्त्रोत : व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पदनाम निहाय माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे आढळते कि, आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण केलेले एकूण ७५ कर्मचारी आहेत. त्यामध्ये ९ (१२.०० %) गट निदेशक, ५३ (७०.६७ %) शिल्प निदेशक, ४ (५.३३ %) लेखापाल, १ (१.३३ %) कार्यशाळा परिचर, ५ (६.६७ %) वर्कशॉप सहाय्यक व ३ (४.०० %) शिपाई आहेत.

## ३.२. अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय यांचे कडून आलेली माहितीचे विश्लेषण व अभिप्राय :

### व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण केंद्र व अभ्यासक्रम निहाय माहिती :

प्रशिक्षण केंद्रे सुरु झाल्यापासून ते आजतगायत एकूण **२०८४७** प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण केंद्र व अभ्यासक्रम निहाय माहिती पुढीलप्रमाणे :

**तक्ता क्र. २७**

| अ. क्र. | अपर आयुक्त कार्यालय | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | अभ्यासक्रमाचे नाव | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इलेक्ट्रिशियन/ मोटार रिपेअरींग | डिझेल इंजिन / मोटार मॅकॅनिक | गवंडी काम / सुतार काम | टि.व्हि./रेडीओ रिपेअरींग | शिवणकाम | ब्युटीपार्लर | मेकॅ. आर.ए.सी. | फिटर | ड्रेस मेकिंग | वेल्डर | मोटार मॅकॅनिक | सुतार काम | **एकूण** |
| १. | **नाशिक** | पळसन | ४४३ | ४२५ | ४०८ | १६२ | ३१३ | ३७३ | ० | ० | ० | ० | ० | ० | **२१२४** |
| २. | | भांगरापाणी | १७० | १२० | १७० | १७० | १७० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **८००** |
| ३. | | वाघझिरा | ६२८ | ६५९ | ० | ७६४ | ० | ० | ४५० | ४५३ | ४८२ | ० | ० | ० | **३४३६** |
| ४. | | केळीरूमणवाडी /मावेशी | २३० | २३५ | ० | १९६ | २६९ | ० | ० | ० | ० | २८ | ० | ० | **९५८** |
| ५. | **ठाणे** | गोहे | ३५१ | ३३७ | ७०२ | ३३० | २८० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **२०००** |
| ६. | | विनवळ | ४४७ | ३३८ | ३५४ | १२८ | २१३ | ० | ० | ० | ० | ० | ४५३ | ३२६ | **२२८९** |
| ७. | | पाथरज | २४१ | २२७ | २२० | ८५ | १२७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **९००** |
| ८. | **अमरावती** | सारखणी | ४६३ | ४५८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **९२१** |
| ९. | | कापरा | १५७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **१५७** |
| १०. | | राणीगाव/ सावलीखेडा | ८५७ | ७८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६५ | **१०००** |
| ११. | **नागपूर** | कडवस | २०८ | २४३ | ० | ० | २८१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **७३२** |
| १२. | | कोटगुल | ३१० | ३०८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **६१८** |
| १३. | | कसनपूर | ८४६ | ८४६ | ० | ८४६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **२५३८** |
| १४. | | कडीकसा | ४७६ | ४०३ | ० | ० | ४४७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **१३२६** |
| १५. | | देवडा/रुपापेठ | ३३८ | ० | ५७८ | ० | १३२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **१०४८** |
| **एकूण** | | | **६१६५** | **४७०७** | **२४३२** | **२६८१** | **२२३२** | **३७३** | **४५०** | **४५३** | **४८२** | **२८** | **४५३** | **३९१** | **२०८४७** |

(स्त्रोत — अपर आयुक्त कार्यालय नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर यांचेकडून आलेल्या माहितीच्या आधारे)

**३.२.१. अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, अमरावती यांचे अभिप्राय :**

**मुद्दा क्र. १ - व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन करून ती चालू ठेवणे किंवा बंद करणेबाबत शिफारस करणे :**

- अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, अमरावती अंतर्गत तीन व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु असून १. प्रकल्प कार्यालय किनवट मधील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सारखणी ता. किनवट जि. नांदेड, २. प्रकल्प कार्यालय पांढरकवडा येथील शासकीय आश्रमशाळा कापरा ता.जि. यवतमाळ, ३. प्रकल्प कार्यालय धारणी येथील शाकीय माध्यमिक आश्रमशाळा राणीगाव/सावलीखेडा, ता.धारणी जि. अमरावती येथे सुरु करण्यात आले आहे. परंतु सद्यस्थितीत सदर प्रशिक्षण केंद्र बंद करण्यात आले आहे.
- शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा सारखणी, ता. किनवट, जि. नांदेड व्यवसाय प्रशिक्षण केंद्र हे सन २०१५-१६ पासून बंद स्थितीत आहे.
- शासकीय आश्रमशाळा कापरा, ता.जि. यवतमाळ येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र हे सन २००८-०९ पासून बंद करण्यात आले आहे.
- शासकीय माध्यमिक आश्रमशाळा राणीगाव/सावलीखेडा, ता. धारणी, जि. अमरावती येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सन २०१८-१९ पर्यंत सुरु होते.
- सद्यस्थितीत तीनही केंद्र बंद करण्यात आले आहे. तेव्हा सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे बंद करण्यात येण्याकरिता शिफारस करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. २ - व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालू ठेवायचे असल्यास त्याच्या अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करून अधिक सक्षमपणे कसे चालविता येतील याबाबत शिफारस करावी :**

- सदर व्यवसाय प्रशिक्षण संस्था सद्यस्थितीत बंद आहे. या प्रशिक्षण केंद्रांच्या अभ्यासक्रमांस मंजूर क्षमते एवढे विद्यार्थी मिळत नाही. त्यांना व्यवसाय संधी प्राप्त होत नसल्याने विद्यार्थी येथे प्रवेश घेत नसल्याचे निदर्शनास येते.
- सदर अभ्यासक्रम अल्प कालावधीचा आहे. सदर अभ्यासक्रमांस दिल्ली बोर्डाची मान्यता नसल्यामुळे प्रमाणपत्राचा उपयोग होत नसल्याचे निदर्शानांस येते. तेव्हा सदर प्रशिक्षण केंद्र बंद करणे योग्य वाटते.

**मुद्दा क्र. ३ - व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करावयाची झाल्यास तेथील साधनसामुग्री व अन्य बाबीचा कशाप्रकारे वापर करता येईल व तेथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे अन्य ठिकाणी समायोजन करता येईल किंवा कसे याबाबत शिफारस करावी :**

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील साधनसामुग्री औद्योगिक प्रशिक्षण केंद्रास उपयोगी पडल्यास त्यांना देता येईल आणि अति प्रमाणात खराब झालेली साधनसामुग्री निर्लेखन करता येईल. तसेच त्या ठिकाणी कर्मचारी कंत्राटी पध्दतीने भरण्यात आले आहेत. परंतु सदर प्रशिक्षण केंद्र बंद असल्याने तेथील कर्मचाऱ्यांकडे असलेली शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन बहुउद्देशीय कर्मचारी संवर्गात समाविष्ट करता येईल परंतु याकरिता कायदेशीर बाबी तपासून घेणे उचित राहील.

### ३.२.२. अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नाशिक यांचे अभिप्राय :

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कळवण, तळोदा, यावल व राजूर यांनी सादर केलेल्या अभिप्रायाशी हे कार्यालय सहमत आहे.

### ३.२.३. अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, ठाणे यांचे अभिप्राय :

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव, जव्हार आणि पेण यांचे अभिप्राय पाठविण्यात आले आहेत. अपर आयुक्त कार्यालयाने स्वतंत्र अभिप्राय सादर केले नाहीत.

### ३.२.४. अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नागपूर यांचे अभिप्राय :

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमांना तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नसल्यामुळे प्रशिक्षणार्थींना प्राप्त प्रमाणपत्राचे आधारे नोकरी/रोजगार प्राप्त करून घेता येत नाही. त्यासाठी आय.टी.आय. प्रमाणे प्रमाणपत्र मिळाली तर ही केंद्रे सुरु ठेवणे योग्य राहील. अशा प्रकारे केंद्र सुरु ठेवायची असतील तर सदर केंद्राचे बळकटीकरण करण्यात यावे व आय.टी.आय. दर्जाचे प्रमाणपत्र त्यांना मिळाले तरच या केंद्राचा विद्यार्थ्यांना रोजगाराकरिता उपयोग होईल.
- सदर केंद्रामधील साधनसामुग्री वापरात नाल्यामुळे कालबाह्य झालेली असल्याने त्या साधनसामुग्रीचे निर्लेखन करण्यात यावे.
- सदर केंद्रातील कर्मचाऱ्यांनी अनेक वर्ष काम केले असल्यामुळे त्यांना इतरत्र समकक्ष पदावर सामावून घेण्यात यावे असे वाटते.

## ३.३. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेली माहितीचे विश्लेषण :

व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांच्या मूल्यमापन अभ्यासासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यरत असणाऱ्या एकूण १५ प्रकल्प कार्यालयांना मूल्यमापन अभ्यासासंबंधीची माहिती प्रश्नावलीमध्ये भरून देण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार प्रश्नावलीतील माहिती ९ (पांढरकवडा, किनवट, धारणी, कळवण, तळोदा, राजूर, यावल, पेण, जव्हार) प्रकल्प कार्यालयांनी भरून दिली आहे व ६ (गडचिरोली, भामरागड, नागपूर, देवरी, चंद्रपूर, घोडेगाव) प्रकल्प कार्यालयांनी भरून दिलेली नाही. त्यामुळे ९ प्रकल्प कार्यालयांनी भरून दिलेल्या माहितीच्या आधारे पुढील विश्लेषण करण्यात आले आहे.


### १) प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देणेबाबतची माहिती :

**तक्ता क्र. २८**

| अ.क्र. | प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देण्यात येते का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १ | ११.११ % |
| २ | नाही | ७ | ७७.७८ % |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ११.११ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. ९**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देणेबाबतची माहिती दर्शविली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देण्यात येते असे सांगितले, ७ (७७.७८ %) प्रकल्प कार्यालयाने प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देण्यात येत नाही असे सांगितले व १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने याबाबत प्रतिसाद नोंदविला नाही.

### २) प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी न देण्याची कारणे :

**तक्ता क्र. २९**

| अ.क्र. | कारणे | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षण केंद्रांकडून यासंबंधी मागणी केली जात नाही | १ | ११.११ % |
| २ | प्रशिक्षण केंद्रांत दरवर्षी साधनसामुग्रीची आवश्यकता भासत नाही | १ | ११.११ % |
| ३ | शासनाकडून साधनसामुग्रीसाठीचा दरसाल निधी उपलब्ध होत नाही | ४ | ४४.४४ % |
| ४ | प्रशिक्षण केंद्रांच्या स्थापनेच्या वेळी आदिवासी विकास आयुक्तालय कार्यालयामार्फत देण्यात आली होती | ५ | ५५.५५ % |
| ५ | प्रतिसाद नाही | ३ | ३३.३३ % |
| **एकूण** | | **९** | |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.
टीप : उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

वरील तक्त्यामध्ये प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी न देण्याची कारणेसंबंधीची माहितीचे विश्लेषण केले आहे. माहिती वरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी १ (११.११ %) प्रशिक्षण केंद्राने साधनसामुग्रीची प्रशिक्षण केंद्रांकडून यासंबंधी मागणी केली जात नाही असे सांगितले, १ (११.११ %) प्रशिक्षण केंद्राने प्रशिक्षण केंद्रांत दरवर्षी साधनसामुग्रीची आवश्यकता भासत नाही असे सांगितले, ४ (४४.४४ %) प्रशिक्षण केंद्राने शासनाकडून साधनसामुग्रीसाठीचा दरसाल निधी उपलब्ध होत नाही असे सांगितले, ५ (५५.५५ %) प्रशिक्षण केंद्राने

प्रशिक्षण केंद्रांच्या स्थापनेच्या वेळी आदिवासी विकास आयुक्तालय कार्यालयामार्फत देण्यात आली होती असे सांगितले व ३ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्राने याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.


### ३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागवण्याबाबतची माहिती :

**तक्ता क्र. ३०**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागविला जातो का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३ | ३३.३३ % |
| २ | नाही | ६ | ६६.६७ % |
| | **एकूण** | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. १०**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील आकृती/तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागवण्याबाबतची माहितीची माहिती दर्शविली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी ३ (३३.३३ %) प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागविला जातो असे सांगितले व ६ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागविला जात नाही असे सांगितले.

### ४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रणाबाबतची माहिती :

**तक्ता क्र. ३१**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर आपल्या कार्यालय अंतर्गत संनियंत्रण केले जाते का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ८८.८९ % |
| २ | नाही | ० | ०.०० % |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ११.११ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर प्रकल्प कार्यालयामार्फत होणाऱ्या संनियंत्रणाबाबतची माहितीची माहिती दिली आहे. माहितीवरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी ८ (८८.८९ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रण केले जाते असे सांगितले व १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने याबाबत प्रतिसाद दिला नाही.

**५) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवडीबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३२**

| अ. क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवड करण्यात आली आहे का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७ | ७७.७८ % |
| २ | नाही | १ | ११.११ % |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ११.११ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवडीबाबतची माहिती दर्शविली आहे. माहितीवरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी ७ (७७.७८ %) प्रशिक्षण केंद्राने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवड करण्यात आली आहे असे सांगितले, १ (११.११ %) प्रशिक्षण केंद्राने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर संनियंत्रण

करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवड करण्यात आलेली नाही असे सांगितले व १ (११.११ %) प्रशिक्षण केंद्राने याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.


**६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड पद्धती बाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३३**

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड पद्धती | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जाहिरात | ४ | ४४.४४ % |
| २ | मुलाखत | ६ | ६६.६७ % |
| ३ | शैक्षणिक अर्हता | ६ | ६६.६७ % |
| ४ | गुणवत्ता | २ | २२.२२ % |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ११.११ % |
| | **एकूण** | **९** | |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.
टीप : उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**आकृती क्र. ११**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.
टीप : उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवरील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड पद्धती बाबतची माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी ४ (४४.४४ %) प्रशिक्षण केंद्रांनी जाहिरात देऊन व्यवसाय

प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड केली आहे असे सांगितले, ६ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी मुलाखत घेऊन व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड केली आहे असे सांगितले, ६ (६६.६७ %) प्रशिक्षण केंद्रांनी शैक्षणिक अर्हता बघून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड केली आहे असे सांगितले, २ (२२.२२ %) प्रशिक्षण केंद्रांनी गुणवत्ता बघून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड केली आहे असे सांगितले व १ (११.११ %) प्रशिक्षण केंद्राने याबाबत कोणताच प्रतिसाद दिलेला नाही.

**७) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशाच्या कालावधी बाबतची माहिती :**


**तक्ता क्र. ३४**

| अ.क्र. | नियुक्ती आदेशाचा कालावधी | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तीन महिन्यासाठी | १ | ११.११ % |
| २ | चार महिन्यासाठी | ५ | ५५.५६ % |
| ३ | सहा महिन्यासाठी | १ | ११.११ % |
| ४ | अकरा महिन्यासाठी | ३ | ३३.३३ % |
| ५ | दोन वर्षांसाठी | २ | २२.२२ % |
| ६ | प्रतिसाद नाही | १ | ११.११ % |
| **एकूण** | | **९** | |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

टीप : उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

**आकृती क्र. १२**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.
टीप : उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद दिला आहे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशाच्या कालावधी बाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना तीन महिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात येतात असे सांगितले, ५ (५५.५६ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना चार महिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात येतात असे सांगितले, १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सहा महिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात येतात असे सांगितले, ३ (३३.३३ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना अकरा महिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात येतात असे सांगितले, २ (२२.२२ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दोन वर्षांसाठी नियुक्ती आदेश देण्यात येतात असे सांगितले व १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने यासंबंधी प्रतिसाद दिलेला नाही.


**८) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्याबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३५**

| **अ.क्र.** | **कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्यात येते का ?** | **प्रकल्प कार्यालय** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ३ | ३३.३३ % |
| २ | नाही | ४ | ४४.४४ % |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | २२.२२ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. १३**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्याबाबतची माहिती माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी ३ (३३.३३ %) प्रशिक्षण कार्यालयाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्यात येते असे सांगितले, ४ (४४.४४ %) प्रशिक्षण कार्यालयाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून मागविण्यात येत नाही असे सांगितले व २ (२२.२२ %) प्रशिक्षण कार्यालयाने याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.


**९) प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देणेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३६**

| अ.क्र. | प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देण्यात आला आहे का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २ | २२.२२ % |
| २ | नाही | ७ | ७७.७८ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. १४**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देणेबाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी २ (२२.२२ %) प्रकल्प कार्यालयाने प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देण्यात आला आहे असे सांगितले व ७ (७७.७८ %) प्रकल्प कार्यालयाने प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यास ठरवून देण्यात आलेला नाही असे सांगितले.


**१०) प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवीत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेणेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३७**

| अ.क्र. | प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवीत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेण्यात येते का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २ | २२.२२ % |
| २ | नाही | ५ | ५५.५६ % |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | २२.२२ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. १५**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवीत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेणेबाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी २ (२२.२२ %) प्रकल्प कार्यालयाने प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवीत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेण्यात येते असे सांगितले, ५ (५५.५६ %) प्रकल्प कार्यालयाने प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवीत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प

स्तरावरून घेण्यात येत नाही असे सांगितले व कार्यालयांपैकी २ (२२.२२ %) प्रकल्प कार्यालयाने याबाबत प्रतिसाद दिला नाही.

**११) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३८**

| **अ.क्र.** | **व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा आहे का ?** | **प्रकल्प कार्यालय** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | २ | २२.२२ % |
| २ | नाही | ६ | ६६.६७ % |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ११.११ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेबाबतची माहिती दर्शविली आहे. माहितीवरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी २ (२२.२२ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा आहे असे सांगितले, ६ (६६.६७ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा नाही असे सांगितले व १ (११.११ %) प्रकल्प कार्यालयाने याबाबत प्रतिसाद दिला नाही.


**१२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवणेबाबतची माहिती :**

**तक्ता क्र. ३९**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवावे असे आपणास वाटते का ? | प्रकल्प कार्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४ | ४४.४४ % |
| २ | नाही | ५ | ५५.५६ % |
| **एकूण** | | **९** | **१००.०० %** |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

**आकृती क्र. १६**




स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्ता/आकृतीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवणेबाबतच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे समजते कि, माहिती उपलब्ध करून दिलेल्या एकूण ९ प्रकल्प कार्यालयांपैकी ४ (४४.४४ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवावे असे सांगितले व ५ (५५.५६ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवू नये असे सांगितले.

## १३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची सद्यस्थिती :

**तक्ता क्र. ४०**

| अ.क्र. | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | सद्यस्थिती (बंद/चालू) | वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कोटगुल | बंद | २०१७ | |
| २ | कसनसूर | बंद | एप्रिल २०२० | कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहे |
| ३ | विनवळ | बंद | एप्रिल २०२० | कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहे |
| ४ | पाथरज | बंद | २०१९ | |
| ५ | गोहे | बंद | २०१९ | |
| ६ | पळसण | बंद | २०२० | कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहे |
| ७ | भांगरापाणी | बंद | २०१९ | |
| ८ | केळीरुमणवाडी/मावेशी | | | |
| ९ | वाघझिरा | बंद | २०२० | कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहे |
| १० | कापरा | बंद | २००८-०९ | |
| ११ | सारखणी | बंद | २०१५-१६ | |
| १२ | राणीगाव/सावलीखेडा | बंद | २०१८-१९ | |
| १३ | कवडस | बंद | २०२०-२०२१ | कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहे |
| १४ | कडिकसा | बंद | २०२० | कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहे |
| १५ | देवाडा/रुपापेठ | बंद | २०१५-१६ | |

स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे.

वरील तक्त्यातील माहितीवरून सद्यस्थितीत एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी सर्वच व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद स्थितीत आहेत. तसेच एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी ६ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद असल्याचे अवलोकन होते.

## ३.४. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेले अभिप्राय :

**३.४.१. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, राणीगाव/सावलीखेडा)

- सदर प्रशिक्षण केंद्र चार-चार महिन्याचे असल्यामुळे विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त करून देण्यास उपयुक्त नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षण केंद्र बंद करण्यात यावे असे प्रकल्प अधिकारी यांनी अभिप्राय दिले आहे.
- सदर प्रशिक्षण केंद्र कमीत कमी १ किंवा २ वर्षे कालावधीचे, परिसरातील गरजेनुरूप ट्रेड सुरु केल्यास विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण/प्रशिक्षण मिळेल तसेच सदर प्रशिक्षण केंद्रावर विभागीय कार्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नियंत्रण राहिल्यास उपयुक्त ठरेल.
- सदर प्रशिक्षण केंद्रातील साहित्य निरुपयोगी असल्यामुळे वापरण्या योग्य नाहीत.
- सदर योजना धारणी प्रकल्पांतर्गत आलेल्या शासकीय आश्रमशाळा, सावलीखेडा येथे सन २००४ पासून सुरु आहे. तथापि, सदर प्रशिक्षण केंद्र मार्च २०१९ पासून बंद करण्यात आले आहे.
- सद्यस्थितीत सावलीखेडा येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात एकूण ६ कंत्राटी कर्मचारी आहेत. सदर प्रशिक्षण केंद्र बंद असल्याकारणाने (माहे मार्च २०१९ पासून नियुक्ती आदेश दिले गेलेले नाही.) या कर्मचाऱ्यांना जवळपास दोन वर्षापासून मानधन दिले गेले नाही.
- या अभ्यासक्रमांसाठी मंजूर क्षमतेएवढे विद्यार्थी उपलब्ध होत नाहीत असे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या कंत्राटी शिक्षकांचे तसेच आश्रमशाळेतील इतर शिक्षकांचे मत आहे.
- सदर व्यवसाय प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध झालेला नाही असे आढळून आले.
- सदर योजना चांगली आहे परंतु प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात बदल करणे तसेच अभ्यासक्रम एक ते दोन वर्षाचे करणे गरजेचे आहे, अभ्यासक्रम निवासी असावे, अभ्यासक्रम हा रोजगारभिमुख असावा तरच आदिवासी तरुण या प्रशिक्षणाकडे आकर्षित होतील.
- प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींना चांगल्या सुविधा (वर्ग खोल्या, बसण्याची व्यवस्था, प्रात्यक्षिक करण्यासाठी चांगल्या दर्जाचे साहित्य, पुस्तके इ.) उपलब्ध करून देणे गरजेचे वाटते.
- सदर व्यवसाय प्रशिक्षणासाठी स्वतंत्र इमारत व कुशल तांत्रिक कर्मचारी असणे तसेच प्रशिक्षण साहित्य चांगल्या दर्जाचे सुस्थितीत व पुरेसे असणे आवश्यक आहे.

- प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड प्रकल्प कार्यालय स्तरावरून योजना सुरु झाली त्यावेळी करण्यात आल्याचे दिसते. सन २००४ ला राणीगाव येथे सुरु झालेल्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड जाहिरात व मुलाखातीव्दारे एकदाच झाली होती. प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्यापासून आजतगायत तेच कर्मचारी कार्यरत असून त्यांना दर चार महिन्यांनी मुदतवाढ देण्यात येते. (मार्च २०१९ पासून नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाही.)
- कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये मानधन व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणारे विद्यावेतन यांची देयके प्रकल्प कार्यालय स्तरावरून काढण्यात येतात.
- सदर प्रशिक्षण केंद्रावर सावलीखेडा व्यतिरिक्त जवळपासच्या परिसरातील विद्यार्थी प्रवेशित असल्याचे आढळून आले नाही.
- सदर प्रशिक्षण केंद्र कायम सुरु ठेवणेबाबत कोणत्याही लोकप्रतिनिधी अथवा स्थानिक पदाधिकारी यांचे अभिप्राय नाही.

**अ) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सावलीखेडा येथील मुख्याध्यापकांनी विषद केलेली माहिती पुढीलप्रमाणे —**

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना प्रवेश घेणेसाठी कुठलीही प्रवेश प्रक्रिया किंवा अतिरिक्त निकष नाहीत, कारण प्रशिक्षण केंद्रात क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थी प्रशिक्षणासाठी प्रवेश घेत असतात.
- ज्या मुला/मुलींना प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेणेसाठी अर्ज केला आहे व आठवी उत्तीर्ण असून अनुसूचित जमातीचे आहेत अशा सर्वांना प्रवेश देण्यात येतो. किंबहुना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेणेसाठी प्रशिक्षणार्थी कमीत कमी आठवी पास अशी एकमेव अट आहे.
- प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणाऱ्या प्रत्येक अभ्यासक्रमाचा कालावधी चार महिन्याचा आहे. या चार महिन्यातील प्रशिक्षणाच्या आधारे कुठेही रोजगार उपलब्ध होत नाही व अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र दिले जात नसल्यामुळे स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षणासाठी तरुण मुले/मुली आकर्षित होण्याचे प्रमाण खूप कमी आहे.
- प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने (प्रति अभ्यासक्रम चार महिने) विहित कौशल्य पूर्णपणे आत्मसात केल्याचा आत्मविश्वास प्रशिक्षणार्थींमध्ये येत नाही.
- प्रशिक्षणासाठी कोणताच अभ्यासक्रम ठरवून देण्यात आलेला नाही.

- शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना तीन महिने नगरात अथवा उपनगरात या ठिकाणी सराव प्रात्यक्षिकेची संधी उपलब्ध करून देण्याची तजवीज नाही किंवा करून दिल्या जात नाही.
- प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रिशिअन, मोटार मेकॅनिक, टी.व्ही./रेडीओ, सुतारकाम असे एकूण चार अभ्यासक्रम शिकविले जातात. शिकविण्यात येणाऱ्या चारही अभ्यासक्रमासाठी त्या विषयातील तंत्रज्ञ कर्मचारी कंत्राटी तत्वावर घेण्यात आलेले आहेत.
- ज्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिमाह रु. ७००/- इतके विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा चार महिने कालावधी पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनाच विद्यावेतन देण्यात येते.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रासाठी स्वतंत्र इमारत नसून शासकीय आश्रमशाळेतील एका वर्गात व्यवस्था करण्यात आलेली आहे.
- प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण केंद्र सुरु झाले त्यावेळीच अभ्यासक्रम निहाय साहित्य उपलब्ध झाले. सद्यस्थितीत साहित्य निरुपयोगी आहे.
- भविष्यात सावलीखेडा येथील प्रशिक्षण केंद्र बंद करावे असे तेथील मुख्याध्यापकांनी त्यांचे मत नोंदविले. याबाबत त्यांनी प्रशिक्षणार्थी मिळत नाही, प्रशिक्षणार्थींना शासन मान्य अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे व सदर प्रशिक्षण आय.टी.आय. च्या धर्तीवर असावे इ. असे मत नोंदविले.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे निरीक्षण केले असता सर्व इमारत चांगल्या स्थितीत असून स्वतंत्र खोली नसल्याचे दिसून आले. अभ्यासक्रमासाठी आलेल्या साधनसामुग्रीची स्थितीही चांगली दिसून आली नाही. साधनसामुग्री खूपच जुनी व वापरण्यास अयोग्य दिसून आली. सद्यस्थितीत अशा साधनसामुग्रीचा शिकविण्यासाठी उपयोग होत नाही असे निदर्शनास आले.

**आ) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सावलीखेडा येथील कंत्राटी कर्मचारी यांनी विषद केलेली माहिती पुढीलप्रमाणे –**

- सावलीखेडा येथील प्रशिक्षण केंद्रात भेटीच्या वेळी एकूण २ कंत्राटी कर्मचारी उपस्थित होते.

- अभ्यासक्रम शिकविण्यासाठी साहित्य नाही. त्यामुळे अभ्यासक्रम शिकवितांना साहित्यांची आवश्यकता भासल्यास त्याची खरेदी स्वत: अभ्यासक्रम शिकविणारे शिक्षक कर्मचारी करतात असे त्यांनी सांगितले.
- कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा रु. ७५००/- इतके मानधन देण्यात येत होते.
- विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेवर मिळत नाहीत.
- प्रकल्प स्तरावरून व प्रशिक्षण केंद्र स्तरावरून प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम ठरवून देण्यात आलेला नाही.
- प्रशिक्षण केंद्रात दरदिवशी प्रशिक्षणार्थींना २ ते ३ तास प्रशिक्षण दिले जाते. अगोदर अभ्यासक्रम (Theory) व नंतर प्रात्यक्षिके (Practical) शिकविले जाते. तथापि, प्रशिक्षणाचे कोणतेही विशिष्ट वेळापत्रक व कामाचे बांधील तास इ. काही आढळून आले नाही.

**इ) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सावलीखेडा येथे प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षणार्थींशी झालेली चर्चा :**

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात मागील ३ ते ४ वर्षात प्रशिक्षण घेतलेले एकूण ६ प्रशिक्षित विद्यार्थी चर्चेस उपस्थित होते.
- प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचे कसलेच पुस्तक दिले जात नाही. मात्र वही, पेन व पेन्सिल देण्यात आली होती.
- प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने अभ्यासक्रमाचे चांगले कौशल्य विकसित होत नाही. सदर कौशल्य आत्मसात केल्याचा विश्वास निर्माण होत नाही. त्यामुळे रोजगार प्राप्त होण्यास अडचणी येतात. सबब अभ्यासक्रमाचा कालावधी किमान एक वर्षाचा असावा. त्याप्रमाणे प्रमाणपत्र मिळत नसल्याने स्वयंरोजगार सुरु करण्याकरिता भांडवली खर्च भागविण्याकरिता कर्ज मिळत नाही. आज पर्यंत कुठल्याही विद्यार्थ्याला रोजगार मिळाला नसल्याचे सांगितले.
- प्रशिक्षणासाठी मिळणारे विद्यावेतन हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर २ ते ३ महिन्यांनी मिळते असे प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले.
- चर्चेस उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी किती विद्यावेतन मिळते याविषयी माहिती नसल्याचे आढळले तथापि ४ महिन्याचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर एकरकमी विद्यावेतन मिळाल्याचे मान्य केले.

- चर्चेस उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षण फायदेशीर आहे असे मत नोंदविले परंतु विद्यार्थी तसेच शिक्षकांची नियमित उपस्थिती आवश्यक असल्याचे सांगितले.

**३.४.२. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सारखणी )

**अ) मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचा भेट अहवाल :**

- किनवट प्रकल्प अंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा सारखणी येथे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सन २००४ पासून सुरु झाले. सद्यस्थितीत सदर प्रशिक्षण केंद्र सन २०१५-१६ पासून बंद स्थितीत आहे.
- सन २०१५-१६ या कालावधीमध्ये सदर प्रशिक्षण केंद्रात ४ कंत्राटी कर्मचारी कार्यरत होते. तथापि कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याकरिता सदर कर्मचाऱ्यांनी न्यायालयात दाद मागितली होती. तेव्हा तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांनी सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्राचे मूल्यमापन केले असता प्रशिक्षणार्थ्यांचा कल प्रशिक्षण केंद्राकडे नसल्याचे दिसून आले. तसेच ग्रामीण भागात औद्योगिक वसाहत नसल्यामुळे प्रशिक्षणार्थींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही त्यामुळे प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थ्यांचा प्रतिसाद नसल्याकारणाने सदर प्रशिक्षण केंद्र बंद करण्याचा तत्कालीन मा. प्रकल्प अधिकारी यांनी निर्णय घेतला.
- सन २०१५-१६ पासून व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद केलेले असल्यामुळे सन २०१६-१७ मध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही.
- सदर व्यवसाय प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थ्याला रोजगार उपलब्ध झालेला नाही असे शिल्पनिदेशक व प्रशिक्षणार्थी यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार आढळून आलेले आहे.
- सदर योजना चांगली आहे परंतु प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात बदल करणे गरजेचे आहे. तरच प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाकडे आकर्षित होतील.
- प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम हा रोजगाराभिमुख असावा.
- प्रशिक्षणार्थ्यांसाठी भौतिक सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. सदर प्रशिक्षण केंद्र शासकीय आश्रमशाळेच्या इमारतीत भरत असल्याचे मुख्याध्यापक यांनी सांगितले.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणाचा कालावधी हा किमान एक वर्षाचा असावा असे वाटते.

- बहुतेक प्रशिक्षणार्थी चार महिन्याचा एकच अभ्यासक्रम पूर्ण करतात. पुढील दोन अभ्यासक्रमच्या प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थी इच्छुक नसतात.
- सदर व्यवसाय प्रशिक्षणासाठी स्वतंत्र इमारत व कुशल तांत्रिक कर्मचारी असणे तसेच प्रशिक्षण साहित्य चांगल्या दर्जाचे व सुस्थितीत असणे आवश्यक आहे.
- प्रशिक्षण केंद्रावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड प्रकल्प कार्यालय स्तरावरून जाहिरात व मुलाखत घेऊन केलेली आहे.
- सदर प्रशिक्षणास दिल्ली बोर्डाची मान्यता नसल्याने प्रमाणपत्राचा उपयोग होत नाही असे शिल्प निदेशाकांनी सांगितले.
- सन २००४ पासून १२०० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. त्यापैकी फक्त १४३ विद्यार्थी स्वयंरोजगार करीत असल्याचे उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते.
- प्रशिक्षण केंद्रात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत धोरणात्मक निर्णय वरिष्ठ स्तरावरून घेण्यात यावा.

**ब) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) यांचे अभिप्राय :**

शासकीय आश्रमशाळा सारखणी येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सन २००४ पासून सुरु झाले परंतु या प्रशिक्षणाचा प्रशिक्षणार्थीना रोजगार अथवा स्वयंरोजगार करण्याकरिता लाभ झालेला दिसून येत नाही. त्यामुळे शासकीय आश्रमशाळा सारखणी येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करणे योग्य वाटते.

**क) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सारखणी येथील प्रशिक्षित झालेल्या ३ प्रशिक्षणार्थीशी झालेली चर्चा :**

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात मागील काही वर्षात प्रशिक्षण घेतलेल्या एकूण ३ प्रशिक्षित विद्यार्थी चर्चा करण्यासाठी उपस्थित होते.
- प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचे कसलेच पुस्तक दिले जात नाही.
- प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने अभ्यासक्रमाचे चांगले कौशल्य विकसित होत नाही. सदर कौशल्य आत्मसात केल्याचा विश्वास निर्माण होत नाही. त्यामुळे रोजगार प्राप्त होण्यास अडचणी येतात. सबब अभ्यासक्रमाचा कालावधी किमान एक वर्षाचा असावा.

- प्रशिक्षणासाठी मिळणारे विद्यावेतन प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर दोन ते तीन महिन्याने मिळते. असे प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले.
- चर्चेस उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी किती विद्यावेतन मिळते याविषयी माहिती नसल्याचे आढळते. तथापि चार महिन्याचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यावेतन मिळण्याचे मान्य केले.
- चर्चेस उपस्थित असलेले प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण फायदेशीर नाही असे मत नोंदविले.

**ड) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सारखणी येथील मुख्याध्यापकांचा अभिप्राय :**

- विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ झालेला नाही. तंत्रयुक्त पद्धतीने ट्रेड ठेवावेत व किमान एक ते दोन वर्षाचे ट्रेड असावेत. सर्व सोयीसुविधा देवून ते चालू करण्यास हरकत नाही.
- सदर केंद्र चालू ठेवायचे असल्यास : इमारत, तज्ञ शिक्षक व सर्व साधन सामुग्री आवश्यक आहे. कोर्सचा कालावधी एक ते दोन वर्षाचा ठेवण्यात यावेत. अभ्यासक्रमात – वीजतंत्री, तारतंत्री, यांत्रिक मोटारगाडी, यांत्रिक डीझेल, शिवणकाम, प्रयोगशाळा तंत्रज्ञान, संगणक, वायरमन, ब्युटीक टेलरिंग आणि फॅशन, इलेक्ट्रोनिक टेक्नोलॉजी, वेल्डिंग आणि डायमेकर इ. ट्रेड चालू करण्यात यावेत. सर्व सोयीसुविधा देवून ते चालू करण्यास हरकत नाही.
- सदर केंद्र बंद करावयाचे झाल्यास : राहिलेले अपूर्ण साहित्य जवळच्या प्रशिक्षण केंद्रात जमा करण्यात यावेत. निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन करण्यात यावेत.

**इ) आदिवासी लोकप्रतिनिधी तथा सरपंच यांचे मनोगत :**

- प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्यामुळे दर्जेदार व्यवसाय प्रशिक्षण मिळत नव्हते.
- प्रशिक्षण वर्गाला शिकविणारे शिक्षक हे अनियमित होते.
- सदर प्रशिक्षणाचा कालावधी वाढविण्यात येऊन तो बारा महिन्याचा करण्यात यावा. सद्यस्थितीत आवश्यक ट्रेड शिकविण्यात यावा. सदर ट्रेडला उचित शैक्षणिक पात्रता आलेला अनुभवी शिक्षक वर्ग नियमित अध्यापन करण्याकरिता नेमण्यात यावा.

### ३.४.३. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा : (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, कापरा)

**अ) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), पांढरकवडा यांचे अभिप्राय :**

- सदर योजना पांढरकवडा प्रकल्पांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा कापरा येथे सन २००४-२००५ पासून सुरु आहे. परंतु सदर प्रशिक्षण केंद्र सन २००९-१० पासून बंद आहे.
- सदर प्रशिक्षण केंद्रात आदिवासी विद्यार्थ्यांकरिता इलेक्ट्रिशन/मोटार रिपेअरींग, टी.व्ही./रेडीओ रिपेअरींग हे दोन अभ्यासक्रम असल्याचे दिसून आलेले आहे.
- सदर प्रशिक्षण केंद्रावर भोजन व निवासाची व्यवस्था नसल्याने सन २००९-१० पासून बंद आहे.
- शासकीय आश्रमशाळा कापरा हे यवतमाळ पासून दुर्गम डोंगराळ भागात असून १० किमी अंतरावर आहे. सदर प्रशिक्षण केंद्राच्या आजुबाजुला लहान-लहान पाच गावे असून ती विरळ लोकवस्तीची आहे. तसेच सदर प्रशिक्षण केंद्रात आजुबाजुच्या ७७ आदिवासी बेरोजगार तरुणांनी वरील २ अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतल्याचे दिसून आले.
- सदर व्यवसाय प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध झालेला नाही असे आढळून आले.
- सदर योजना चांगली आहे परंतु प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात बदल करणे गरजेचे आहे तरच आदिवासी तरुण या प्रशिक्षणाकडे आकर्षित होतील. तसेच सदर अभ्यासक्रम हा रोजगाराभिमुख असावा.
- प्रशिक्षणासाठी चांगल्या सुविधा (वर्ग खोल्या, बसण्याची व्यवस्था, प्रात्यक्षिक करण्यासाठी चांगल्या दर्जाचे साहित्य इ.) उपलब्ध करून देणे गरजेचे वाटते.
- प्रशिक्षणाचा कालावधी किमान एक वर्षाचा असायला पाहिजे.
- बहुतांश प्रशिक्षणार्थी फक्त चार महिन्याचा एकच अभ्यासक्रम पूर्ण करतात. पुढील दोन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ते प्रशिक्षणार्थी उत्सुक नसतात.
- सदर व्यवसाय प्रशिक्षणासाठी स्वतंत्र इमारत व कुशल तांत्रिक कर्मचारी असणे तसेच प्रशिक्षण साहित्य चांगल्या दर्जाचे व सुस्थितीत असणे आवश्यक आहे.
- प्रशिक्षण केंद्रावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड प्रकल्प कार्यालय स्तरावरून योजना सुरु झाली त्यावेळी करण्यात आल्याचे दिसते. सन २००५ ला कापरा येथे सुरु झालेल्या व्यवसाय प्रशिक्षण

केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड ही एकदाच झाली होती. प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्यापासून आजतगायत तेच कर्मचारी कार्यरत असून त्यांना दर एक वर्षांनी मुदतवाढ देण्यात येते.

- कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणारे विद्यावेतन यांची देयके प्रकल्प कार्यालय स्तरावरून काढण्यात आलेली आहे.

**ब) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, कापरा येथील मुख्याध्यापकांचा अभिप्राय :**

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना प्रवेश घेणेसाठी कुठलीही प्रवेश प्रक्रिया किंवा अतिरिक्त निकष नाहीत कारण प्रशिक्षण केंद्रात क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थी प्रशिक्षणासाठी प्रवेश घेत असतात.
- ज्या मुला/मुलींना प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेणेसाठी दहावी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण असून अनुसूचित जमातीचे आहेत अशा सर्वांना प्रवेश देण्यात येतो, किंबहुना व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी दहावी पास किंवा दहावी नापास अशी एकमेव अट आहे.
- प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणाऱ्या प्रत्येक अभ्यासक्रमाचा कालावधी चार महिन्याचा आहे. या चार महिन्यातील प्रशिक्षणाच्या आधारे कुठेही रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षणासाठी तरुण मुले/मुली आकर्षित होण्याचे प्रमाण खूप कमी आहे.
- एका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी इतर अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचे किंवा पूर्ण करण्याचे प्रमाण खूप कमी आहे.
- प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने (प्रति अभ्यासक्रम ४ महिने) विहित कौशल्य पूर्णपणे आत्मसात केल्याचा आत्मविश्वास प्रशिक्षणार्थींमध्ये येत नाही, सबब त्यांना पुढील अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याची इच्छा व उत्सुकता वाटत नाही.
- प्रशिक्षणासाठी कोणताच अभ्यासक्रम ठरवुन देण्यात आलेला नाही. शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयांमधील (ITIs) संबंधित कौशल्य प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सदर योजनेतून देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणासाठी वापरण्यात यावा असे सर्वसाधरण निर्देश आहेत. तथापी कमी कालावधीमुळे तो पुर्ण करणे शक्य होत नाही.
- शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या विद्याथ्यांना तीन महिने नगरात अथवा उपनगरात या ठिकाणी सराव प्रात्यक्षिकेची संधी उपलब्ध करून देण्याची तजवीज नाही.

- प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रिशीअन/मोटार रिपेअरींग, डिझेल इंजिन/मोटार मॅकेनिक, टी.व्ही/रेडिओ रिपेअरींग असे अभ्यासक्रम शिकविले जातात. शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी त्या विषयातील तंत्रज्ञ कर्मचारी कंत्राटी तत्वावर घेण्यात आलेले आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दर ११ महिन्याला प्रकल्प कार्यालयामार्फत मुदतवाढ देण्यात येते.
- ज्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणसाठी प्रवेश घेतला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिमाह रु. ४००/- विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा ४ महिने कालावधी पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीनाच विद्यावेतन देण्यात येते.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रासाठी स्वतंत्र इमारत असल्याचे दिसुन आले, परंतु ती सुस्थितीत नसल्याचे निदर्शनास आले.
- प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण केंद्र सुरु झाले त्यावेळीच अभ्यासक्रम निहाय साहित्य उपलब्ध झाले होते.
- प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षण हॉल व इतर खोल्यांची दुरुस्ती किंवा रंगरंगोटी प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्यापासून एकदाही करण्यात आलेली नाही.
- भविष्यात कापरा येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र अन्यत्र स्थलांतरीत करावे असे मत तेथील मुख्याध्यापकांनी नोंदविले. याबाबत त्यांनी प्रशिक्षणार्थी मिळत नाही, परिसरातील सर्व विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण झाले आहे. तसेच सदर प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना भोजनाची व निवासाची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. तसेच प्रशिक्षणार्थीना शासन मान्य अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे व सदर प्रशिक्षण आय.टी.आय. च्या धर्तीवर तालुक्याच्या ठिकाणी असावे असे मत नोंदविले.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे निरीक्षण केले असता सर्व इमारत चांगल्या स्थितीत दिसून आली नाही. अभ्यासक्रम निहाय खोल्यांचे निरीक्षण केले असता अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेल्या साधनसामग्रीची स्थितीही चांगली दिसून आली नाही. साधनसामुग्री खुप जुनी व वापरण्यास अयोग्य दिसुन आली. सद्यस्थितीत अशा साधनसामुग्रीचा शिकविण्यासाठी उपयोग होत नाही असे निदर्शनास आले.
- सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये श्री.एस.आर.भारसाकळे (सहायक शिक्षक) वय – ४५, श्री. व्ही.पी.भडभडे (सहायक शिक्षक) वय - ४५, श्री.एस.के.कांबळे (सहायक शिक्षक) वय - ४० हे

कार्यरत होते, यांच्याशी दुरध्वनी वरुन संपर्क केला असता त्यांचे कोणतेही वेतन बाकी नसल्याचे तसेच श्री.विठोवा पांडुरंग भरभडे (सहायक शिक्षक) यांचे देहावसन झाल्याबाबत मुख्याध्यापक शासकीय आश्रमशाळा कापरा यांनी दि. ०२/०६/२०२१ रोजी कार्यालयास पत्राद्वारे कळविले आहे.

- कापरा येथील प्रशिक्षण केंद्रात भेटीच्या वेळी वरील पैकी एकही कर्मचारी उपस्थित नव्हते.
- कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा रुपये २५००/- (अक्षरी - दोन हजार पाचशे) ते ३५००/- (तिन हजार पाचशे रुपये) मानधन तत्वार नियुक्ती दिल्याचे दिसुन येते.
- विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन दिल्याचे दिसुन येते.
- प्रशिक्षण केंद्रात दररोज प्रशिक्षणार्थीना २ ते ३ तास प्रशिक्षण दिले जाते. अगोदर अभ्यासक्रम Theory व नंतर Practical शिकविले जाते. तथापि, प्रशिक्षणाचे कोणतेही विशिष्ट वेळापत्रक व कामाचे बांधील तास इ. काही आढळून आले नाही.
- व्यवसाय प्रशिक्षण कापरा येथील प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षीत विद्यार्थ्यांची भेट झाली नाही.
- शासकीय आदिवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील व्यवासाय प्रशिक्षण केंद्र कापरा येथे सन २००४-०५ ते २००९-१० या कालावधीत व्यवसाय प्रशिक्षणसाठी एकुण १५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कापरा येथे सद्यस्थितीत आलमारी - ५ नग डेस्कबेंच - १०० नग व इमारत २ इत्यादी पडित साहित्य उपलब्ध आहे.
- व्यवसाय प्रशिक्षण कापरा येथे भेट दिली असता सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांना भोजनाची व निवासाची व्यवस्था नसल्याने बंद झाल्याचे निदर्शनास येते, तसेच सदर प्रशिक्षण केंद्र यवतमाळ जिल्हयापासुन अगदी १० कि.मी. अंतरावर असुन दुर्गम जंगल भागात आहे. कापरा येथील आज-बाजुच्या ८ ते १० गावातील विद्यार्थ्यांसाठी सदर व्यवसाय केंद्र उपयुक्त आहे, परंतु जिल्हयातील शासकीय आदिवासी औद्यागिक प्रशिक्षण केंद्र फक्त १० कि.मी. अंतरावर असल्याने व तिथे विविध प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध असल्याने सदर गावातील विद्यार्थी हे यवतमाळ येथे जाऊन प्रशिक्षण घेत असल्याचे निदर्शनास येते.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कापरा हे झरी - जामणी या तालुक्यात स्थलांतरीत केल्यास व तिथे कोणतेही औद्योगिक प्रशिक्षण संस्था नसल्याने तेथील विद्यार्थ्यांना याचा नक्कीच फायदा होऊ शकतो, तसेच

सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांसाठी शाळेतूनच निवासाची व भोजनाची व्यवस्था व विविध प्रकारचे अभ्यासक्रम दिल्यास सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र नक्कीच यशस्वी होऊ शकते.

**३.४.४. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, गोहे)

- शासकीय आश्रमशाळा गोहे संलग्न व्यवसाय प्रशिक्षण केंद्र गोहे हे आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २००४ अन्वये सन २००४-२००५ पासुन गोहे येथे कार्यान्वित आहे. सदर प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रीशयन, डिझेल मॅकनिक, गवंडीकाम, सुतारकाम, एम.आर.टी.व्ही. व शिवणकाम इत्यादी ट्रेडचे प्रशिक्षण अनुसुचित जमातीच्या विदयार्थ्यांना देण्यात आलेले आहे. सदर कालावधीमध्ये सर्व ट्रेड मिळुन आजपर्यंत अंदाजित २००० विदयार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- सदर प्रशिक्षण कालावधी हा ४ महिन्याचा असुन एका वर्षात तीन बॅच मध्ये प्रशिक्षण पुर्ण करण्यात येत होते. प्रशिक्षण केंद्रातील विदयार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ज्या निदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांना प्रति माह ७५००/- एवढे मानधन देण्यात येत होते.
- सदर प्रशिक्षण केंद्राची तपासणी केली असता एकंदरीत असे वाटते की, सदर प्रशिक्षण केंद्र ज्यावेळेस सुरु झाले होते त्यावेळेस सदर प्रशिक्षण केंद्रास भरपुर मोठया प्रमाणात प्रशिक्षणार्थीचा प्रतिसाद लाभलेला होता. तसेच आजुबाजुच्या परीसरातील बहुतांशी विदयार्थ्यांनी सदर प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे. माहे नोव्हेंबर २०१९ पासुन प्रशिक्षण केंद्रात विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला नसल्याने तसेच पुरेशा प्रमाणात विदयार्थी उपलब्ध होत नसल्याकारणाने सदर प्रशिक्षण केंद्र हे बंद असल्याचे आढळून आले.
- सदर प्रशिक्षण केंद्रात एका ट्रेडसाठी प्रशिक्षण कालावधी हा चार महिन्याचा आहे. परंतु चार महिन्याच्या कालावधीत विदयार्थ्यांचे संबधित विषयाचे प्रशिक्षण पुर्ण होत नाही तसेच प्रशिक्षण पुर्ण केलेल्या विदयार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे सर्टिफीकेट मिळत नसल्याने सदर प्रशिक्षणार्थीना कोणत्याही कंपनीत नोकरीसाठी रुजु करुन घेत नाहीत किंवा या केंद्रातील चार महिन्याच्या कोर्सच्या कालावधीत प्रशिक्षणार्थी विदयार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध असलेल्या ट्रेडचे संपुर्ण ज्ञान देण्यास अडचण निर्माण होते.

- सदर प्रशिक्षण केंद्र हे तालुका मुख्यालयापासुन अंदाजित १५ किमी अंतरावर आहे. शिवाय आंबेगाव तालुक्यामध्ये औदयोगिक क्षेत्र नाही. सबब प्रशिक्षण केंद्र हे गोहे याठिकाणा ऐवजी आदिवासी बहुल भाग असणाऱ्या इतर तालुक्यात म्हणजेच खेड किंवा जुन्नर तालुक्यात स्थलांतरीत करण्यात यावे असे वाटते जेणेकरून सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्राचा त्या त्या तालुक्यातील आदिवासी तरुणांना लाभ घेता येईल.
- सदर प्रशिक्षण केंद्र बंद असल्याने तेथे कार्यरत असलेल्या निदेशकांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे.
- सदर प्रशिक्षण केंद्र येथील निदेशकांचे तात्पुरत्या स्वरुपात प्रकल्प कार्यालय अंतर्गत शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे व सैन्य व पोलीसभरतीपुर्व प्रशिक्षण केंद्रात आवश्यकतेनुसार वर्ग चार पदावर मानधन तत्वावर पर्यायी व्यवस्थेने समायोजन करण्याबाबत तसेच व्यवसाय प्रशिक्षण केद्रास मंजुर असणाऱ्या मानधनानुसार मानधन देण्यास हरकत नाही असे वाटते.
- सदर प्रशिक्षण केंद्र येथील प्रशिक्षणाचा कालावधी हा चार महिन्याचा आहे त्याऐवजी सदर कालावधी आयटीआयच्या धर्तीवर एक वर्षाचा करण्यात यावा जेणेकरुन सदर ट्रेडचे परीपुर्ण ज्ञान संबंधित प्रशिक्षणार्थीना मिळेल. तसेच सदर प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र देण्यात यावे. प्रशिक्षण कालावधी हा एक किंवा दोन वर्षांचा झाल्यास तसेच प्रशिक्षणार्थींना सदर ट्रेडचे प्रशिक्षण पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यास त्यांना स्वतःचा व्यवसाय चालु करता येईल किंवा खाजगी कंपनीत सरकारी निमसरकारी विभागात नोकरी मिळेल. जेणेकरुन आदिवासी समाजातील होतकर तरुणांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी देखील मदत होईल.
- तथापी सदर प्रशिक्षण केंद्र हे बंद झाल्यास त्याचा परीणाम आदिवासी समाजातील तरुणांच्या प्रगतीवर होऊ शकतो त्यामुळे अनेक होतकरु आदिवासी तरुण या प्रशिक्षणापासुन वंचित राहतील. त्यामुळे सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र हे गोहे ता.आंबेगाव याठिकाणीहुन खेड किंवा जुन्नर तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावे.

**३.४.५. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पळसन)

- सदर प्रशिक्षण केंद्र सन २००४ - २००५ या वर्षात सुरु करण्यात आलेले आहे.
- सदर प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रिशन/मोटार रिपेरिंग, डीझेल इंजिन/मोटार मॅकेनिकल, गवंडी काम/ सुतार काम, रेडीओ/टी. व्ही. रिपेरिंग, ब्युटीपार्लर व शिवणकाम इ. अभ्यासक्रम शिकविले जात आहेत.
- सन २००४ – ०५ या वर्षात व्यवसाय प्रशिक्षण केंद्रासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीवर रु. १,१७,२१४/- इतकी रक्कम खर्ची झाली आहे. तद्नंतर कोणताही निधी वा साधनसामुग्री प्राप्त झालेली नाही.
- केंद्रीय अर्थसहाय्य योजनेतून कर्मचाऱ्यांचे मानधन दिले जाते. सद्यस्थितीत व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात एकूण केंद्रप्रमुख/गट निदेशक – ०१, निदेशक ०६, लेखापाल - ०१, वर्कशॉप अकाऊटंट - ०१ व शिपाई - ०१ इ. मानधन तत्वावर पदे कार्यरत आहेत.
- मानधन नियुक्त कर्मचाऱ्यांना सन २००४-०५ ते २०१९-२० पर्यंत एकूण मानधन रक्कम रु. ५७७२३९९/- इतके मानधनावर खर्च करण्यात आलेला आहे.
- सन २००४ – ०५ या वर्षापासून प्रशिक्षण केंद्र चालू आहे. प्रत्येक वर्षाला सर्वच अभ्यासक्रम शिकण्यासाठी सुमारे १६ प्रशिक्षणार्थीची क्षमता होती. अभ्यासक्रमात वाढ झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी क्षमता कमी करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्यापासून ते आजपर्यंत असे एकूण प्रवेशित २४८१ असून २०५२ प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रशिक्षणार्थी आहेत.
- सदर प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण घेतांना त्यांना विद्यावेतानावरील सन २००४ - ०५ ते २०१९-२० पर्यंत सुमारे रक्कम रु. २२६९८५३/- इतके विद्यावेतन प्रशिक्षणार्थींना देण्यात आलेला आहे.
- प्रशिक्षणार्थींची रोजगार/स्वयंरोजगाराची सन २००४ – २००५ पर्यंतची माहिती उपलब्ध झाली नाही. सन २०१६ – १७ ते २०१९ – २० दरम्यान प्रशिक्षण घेतलेल्या एकूण प्रशिक्षणार्थीपैकी सुमारे ६५ लाभार्थी स्वयंरोजगार करीत आहेत. उर्वरित प्रशिक्षणार्थींशी कोरोना संसर्ग प्रादुर्भावामुळे संपर्क साधने शक्य झालेला नाही.

- सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रास शासकीय आश्रमशाळा, पळसन यांच्या अखत्यारीत असलेल्या जुन्या टाईप प्लान मधील खोल्याचा वापर केला जात आहे. स्वतंत्र वर्ग व्यवस्था नाही. एकाच खोलीमध्ये दोन अभ्यासक्रम वर्ग भरविले जातात. प्रॅक्टिकल करिता स्वतंत्र वर्कशॉप नाही, प्रशिक्षणार्थी वर्ग खोलीत प्रॅक्टिकल, थिअरी व साधनसामुग्री ठेवण्याची व्यवस्था एकाच खोलीत आहे. सद्यस्थितीत तीन शेड वापरात आहेत, सदर शेड वापरण्या योग्य नाही.
- सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालू ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारत अभ्यासक्रम निहाय सोयी सुविधायुक्त होणे अत्यंत आवश्यक आहे.
- प्रत्येक अभ्यासक्रम निहाय साधनसामुग्री खरेदी करणे अत्यावश्यक आहे.
- जे प्रशिक्षणार्थी गावातून ये - जा करतात त्यांना ये - जा करण्यासाठी तसेच इतर खर्चापोटी मिळणारे विद्यावेतन नियमित वेळेत मिळावे जेणेकरून प्रशिक्षणार्थी नियमित प्रशिक्षण घेतील. तसेच जे प्रशिक्षणार्थी दूर अंतरावरून प्रशिक्षण घेण्यास येतात त्यांच्या निवास व्यवस्थेच्या सोयी सुविधा क्रमप्राप्त आहे.
- प्रशिक्षण केंद्रातून पूर्ण केलेल्या अभ्यासक्रम प्रमाणपत्राचा प्रशिक्षणार्थीला कंपनी, संस्था व शासन यात नोकरी किंवा रोजगार/स्वयंरोजगार दिला जावा, जेणेकरून, प्रशिक्षण केंद्रातील मागणी वाढू शकेल.
- प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम शिकविणारा शिक्षक वर्गाची नियुक्ती कायम असावी त्यांना मिळणारे वेतन नियमित व वेळेवर मिळावेत जेणेकरून शिकण्याचा दर्जा चांगला राहू शकेल.
- एकंदरीत सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालू ठेवण्यासाठी नवीन इमारत बांधकाम, अभ्यासक्रमनिहाय साधनसामुग्री खरेदी व शिक्षण, शिक्षकेत्तर कर्मचारी वेतन व प्रशिक्षणार्थी विद्यावेतन इत्यादींची नियमित पूर्तता होणे आवश्यक आहे. कळवण प्रकल्प कार्यक्षेत्रात अन्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र नाही. तसेच स्थानिक विद्यार्थी व पालकांच्या मागणीवरून प्रशिक्षण केंद्र चालू ठेवण्यात यावा असे वाटते.

**३.४.६. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, भांगरापाणी)

- सदर प्रशिक्षण केंद्र सन २००४-०५ या वर्षात सुरु करण्यात आलेले आहे.
- प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रीशन, रेडीओ/टीव्ही मॅकेनिक, सुतारकाम, केस कर्तन शिकवण, डीझेल इंजिन/मोटार मॅकेनिक असे ५ ट्रेड शिकविण्यात येत होते. परंतु सन २०१६ पासून डीझेल इंजिन/मोटार मॅकेनिक बंद आहे. सध्या ४ ट्रेड ३० जून २०१९ पर्यंत चालू होते. परंतु १ जुलै २०१९ पासून हे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद आहे.
- केंद्रीय अर्थ सहाय्य योजनेतून कर्मचाऱ्यांचे मानधन दिले जात होते. (३० जून २०१९ पर्यंत)
- ३० जून २०१९ पर्यंत प्रशिक्षण केंद्रात एकूण केंद्रप्रमुख/गट निदेशक - ०१, निदेशक - ०४, अकाऊंटंट - ०१, शिपाई - ०१ असे एकूण ७ कर्मचारी मानधन तत्वावर कार्यरत होते.
- सन २००४-०५ या वर्षापासून प्रशिक्षण केंद्र चालू होते. प्रत्येक सत्राला ५ अभ्यासक्रम शिकण्यासाठी प्रत्येकी १० प्रशिक्षणार्थी क्षमता होती. सदर प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण घेताना त्यांना सन २००४-०५ ते २०१८-१९ पर्यंत विद्यावेतन देण्यात आले आहे.
- प्रशिक्षणार्थी रोजगार/स्वयंरोजगार संबंधीची सन २००४-०५ ते २०१५-१६ पर्यंतची माहिती उपलब्ध झाली नाही. सन २०१६-१७ ते २०१८-१९ पर्यंतच्या प्रशिक्षणार्थी पैकी सुमारे २५ ते ३० लाभार्थी स्वंयरोजगार असल्याचे तोंडी सांगण्यात आले. इतर प्रशिक्षणार्थीशी कोरोना संसर्ग प्रादुर्भावामुळे व इतर काही कारणाने संपर्क करता येत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करता आली नाही.
- सन २००४-०५ या वर्षात व्यवसाय प्रशिक्षण केंद्रासाठी साधन सामुग्री देण्यात आली होती. तद्‌नंतर कोणतीही साधन सामुग्री देण्यात आली नाही.
- सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रास शासकीय आश्रम शाळा भांगरापानी यांच्या अखत्यारीत असलेल्या जुन्या खोल्यांचा वापर केला जात होता. स्वतंत्र वर्ग व्यवस्था नाही. एकाच खोलीमध्ये दोन अभ्यासक्रम वर्ग भरविले जातात. प्रॅक्टिकल करिता स्वतंत्र वर्कशॉप नाही.
- १. शासकीय पोस्ट बेसिक आश्रम शाळा भांगरापानी ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार सलग्न व्यवसाय प्रशिक्षण केंद्र हे १ जुलै २०१९ पासून बंद आहे, २. सदर प्रशिक्षण केंद्राला भौतिक सुविधा पुरेशा नाहीत. वेगवेगळया ट्रेड साठी आवश्यक साधन सामुग्री व साहित्य उपलब्ध नाही, ३. सर्वच

कर्मचारी मानधन तत्वावर असल्याने त्यांचे वेळोवेळी प्रशिक्षण झालेले नाही, ४. प्रकल्प स्तरीय समितीचा अहवाल आवक क्रमांक ८९२७ दिनांक २४/०५/२०१९ नुसार सदर प्रशिक्षण केंद्राचा उदिष्ट साध्य होत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांनतर सदर प्रशिक्षण केंद्र बंद असल्याचे दिसून येते, ५. मा. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा जि. नंदुरबार यांचे पत्र जा.क्र. शिक्षण -२०२० प्र.क्र./का.१०(२)७६७८ तळोदा दि. २३.१०. २०२० अन्वये मा. आयुक्त व मा. अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांच्याकडे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन व कार्यवाही करणे बाबत विनंती पत्र पाठविले होते परंतु अद्याप पर्यंत त्याबाबत मार्गदर्शन आदेश प्राप्त झालेले नाहीत.

- शासकीय आदिवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळा, भांगरापाणी जि. नंदुरबार येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र दि. १ जुलै, २०१९ पासून बंद असून ते बंदच ठेवावे असे वाटते.

**३.४.७. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, वाघझिरा)

- सदर प्रशिक्षण केंद्र १ मार्च २००४ रोजी सुरु झाले. यात एकूण १२ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामध्ये प्राचार्य – ०१, लेखापाल – ०१, शिल्पनिदेशक – ०६, कार्यशाळा परिचर – ०२, शिपाई – ०२ असे कर्मचारी आहेत.
- सदरचे प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रम हे तांत्रिक (Technical) स्वरूपाचे आहे. या अभ्यासक्रमात आवश्यक असणारे प्रयोगासाठी/अनुभवासाठी लागणारी साधनसामुग्री दिसून येत नाही. प्रायोगिक ज्ञान (Practical Knowledge) हे प्रशिक्षणार्थींना प्राप्त होत नसल्याचे दिसून येते.
- सदरचे कोर्स बाबत प्रशिक्षणार्थीची कोणतीही परीक्षा घेतली जात नाही व मूल्यमापनही होत नाही. केवळ प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. त्यामुळे कोणत्या आधारे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते याबाबत साशंकता निर्माण होत आहे.
- सदर प्रशिक्षण केंद्रात २०१५ पासून शिवणकाम/ड्रेस मेकिंग, यांत्रिक रेडीओ/टी.व्ही., इलेक्ट्रिशियन, पंप मेकॅनिक व फिटर या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाते.
- सदरच्या अभ्यास शिवणकाम/ड्रेस मेकिंग करीता शिलाई मशिन दिसून आले नाहीत. रेडीओ/टिव्ही मेकॉनिक, पंप मेकॉनिक/रेफ्रिजरेटर मेकॉनिक, फिटर/इलेक्ट्रीशिअन या अभ्यासक्रमाचे कोणतेही

प्रायोगिक ज्ञान (Practical Knowledge) दिले जात नाही. संपूर्ण अभ्यास हा चित्राच्या (Wall Painting) सहाय्याने पूर्ण केला जातो. व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सुतार कामाचे साहीत्य दिसून येते. तथापी सदर अभ्यासक्रम बंद करण्यात आलेला आहे. ज्याचे साहीत्य सामुग्री उपलब्ध आहे ते बंद करण्यात आलेले आहे. व ज्याचे साहीत्य नाही त्याचा अभ्यासक्रम सुरु ठेवण्यात आला आहे.

- सदरच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सुमारे १०० प्रशिक्षणार्थीना एकुण वर्षभरात तिन प्रशिक्षण कोर्स चित्रांच्या आधारे शिकविले जातात. अभ्यासक्रमाची दैनंदिन वेळ सकाळी ११ ते ०२ वाजेपर्यंत आहे.
- सदरचे अभ्यासक्रमातील प्रशिक्षणार्थी आतापर्यंतचे कोणीही व्यवसायात/नोकरीत कार्यरत असल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांना प्राप्त होणारे मासिक उत्पन्न दिसून येत नाही. कारण व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची उपयोगीता प्रभावशाली दिसून येत नाही. प्रशिक्षणार्थीना केवळ विद्यावेतन मिळत असुन त्यांच्या जिवनात बदल झालेला दिसून येत नाही.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या कर्मचाऱ्यांना दर ३ महिन्यातून एक दिवसाचा खंड देवून नियुक्ती आदेश दिले जातात. कोविड १९ च्या महामारीमुळे व मा. जिल्हाधिकारी सो. जळगाव यांच्या आदेशान्वये यावल प्रकल्पातील तसेच संपूर्ण जळगाव जिल्ह्यातील सर्व शाळा/शैक्षणिक संस्था/शासकिय व अनुदानीत आश्रम शाळा/कोचिंग क्लॉसेस वगैरे माहे एप्रिल २०२० पासुन बंद असल्याने तसेच प्रशिक्षणही बंद असल्याने व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना रोजंदारी नियुक्ती आदेश पारीत करण्यात आलेले नाही. या कारणास्तव आजपर्यंतचे कोणतेही मानधन अथवा विद्यावेतन कोविड १९ कालावधीत अदा करण्यात आले नाही. व करता येणार नाही.
- व्यवसाय प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड पद्धती बाबत प्रवेश अर्ज, निवड केलेले विद्यार्थी/त्यांची गुणवंता यादी मागणी केली असता संबंधीत प्राचार्य यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. निवड प्रक्रिया कशी केली? याबाबत कार्यालयास कळविले नाही. विद्यार्थी निवड यादी मा प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत प्रमाणीत केली नाही.
- शासनाच्या परीपत्रकानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (DBT) केलेली दिसुन येत नाही. काहींना चेकद्वारे अदा केल्याचे दिसून येते.

- प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शाळेचे दाखले मागणी करूनही अवलोकनास प्राप्त होवू शकले नाही. प्रवेशित विद्यार्थी DBT पात्र / अपात्र समजुन येत नाही.
- कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सन २००४ पासून नियुक्ती आदेशाच्या सत्यप्रत मागणी करूनही देण्यात आलेल्या नाहीत.
- तीन वर्षाच्या विद्यावेतनाच्या वाटपाच्या सत्यप्रत मागणी करूनही देण्यात आलेल्या नाहीत.
- कंत्राटी कर्मचाऱ्यांचा कामाचा मासिक अहवाल मागणी करूनही देण्यात आलेला नाहीत.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्राचा प्रशिक्षण विषयक अहवाल मागणी करूनही देण्यात आलेला नाहीत.
- शासकीय आदिवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळा वाघझिरा जि. जळगाव येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची उपयोगिता दिसून येत नाही. तसेच यावल प्रकल्प कार्यालय अधिनस्त शासकीय माध्यमिक आश्रमशाळा जोंधनखेडा जि. जळगाव व आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह जळगाव येथे संलग्न औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून सदर प्रशिक्षण संस्थेस जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम योजनेंतर्गत निधी दिला जातो. त्यामुळे वाघझिरा येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची उपयोगिता दिसून येत नसल्याने सदरचे प्रशिक्षण केंद्र बंद करणे योग्य राहील अशी या कार्यालयाची धारणा आहे व सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांना इतरत्र समायोजित करण्यात यावे.

**३.४.८. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, केळीरुमणवाडी/मावेशी )

- सद्यस्थितीत एक विद्यार्थी शासन निर्णय दि. १७ ऑगस्ट २०११ व्दारे निश्चित केलेल्या ५ अभ्यासक्रमांपैकी कोणतेही ३ अभ्यासक्रम एका वर्षात पूर्ण होत नाही.
- जे अभ्यासक्रम निश्चित केलेले आहेत ते लाभार्थी मागणी व पुरवठा या तत्वानुसार नाहीत, त्यामुळे त्यांची मागणी आहे ते अभ्यासक्रम असावेत.
- शासन मान्य बरेच खाजगी संस्थांचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु आहेत. त्यांचे अभ्यासक्रम शुल्क, कालावधी इ. निश्चित केलेले आहे. आश्रमशाळा हे केंद्र या संस्थांची विहित कार्यपद्धतीने निवड करून त्यांच्या बाह्य संस्थेव्दारे (Out Sourcing) ठराविक कालावधीत देण्याबाबत विचार व्हावा.
- सदर केंद्राचे सनियंत्रण करण्यासाठी जवळील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य व प्रकल्प अधिकारी यांची समिती असावी व त्यांनी सदर योजनेच्या परिणाम करणे बाबत नेहमी आढावा घ्यावा.
- व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रीकरण आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि. २३ ऑगस्ट २००४ अन्वये नमूद असलेल्या एकूण १२ प्रशिक्षण केंद्रापैकी अ.क्र. ४ ची योजना सद्यापावेतो आश्रमशाळेवार सुरु आहे. शासन निर्णय प्रमाणे सुसंगत ही योजना असावी.
- समग्रशिक्षा अभियान च्या व्यवसाय शिक्षण अंतर्गत काही आश्रमशाळेवर इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण सुरु आहे. त्यापैकी काही शाळांवर प्रस्तुत योजना सुरु आहे व काही शाळांवर व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रीकरण ही पण योजना आहे. त्यामुळे उक्त योजनांचा समन्वय साधून निश्चित धोरण ठरविणे आवश्यक आहे.
- योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सविस्तर मार्गदर्शक सूचना त्यांना वित्तीय व साहित्य खरेदीचे अधिकार, कर्मचारी निवड कार्यपद्धती, अस्थापना इ. नमूद असावे.
- प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र अधिकृत शासकीय मान्यतेचे असावे.
- शासकीय आदिवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळा केळीरुमणवाडी सध्या मावेशी ता. अकोले जि. अहमदनगर येथील प्रशिक्षण केंद्र चालू ठेवण्यात यावे असे वाटते.

**३.४.९. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पाथरज)

- सदरील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात फोरमन (०१), ट्रेड इंस्ट्रक्टर (०६), वर्कशॉप अटेंडन्ट (०२), शिपाई (०२) व अकाऊंटंट (०१) इ. पदांना मानधनावर मंजुरी देण्यात आली आहे.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पाथरज येथे विद्यार्थांना सुतारकाम, मोटार मेकॅनिक व इलेक्ट्रिशियन अशा ३ ट्रेडची मान्यता आहे. प्रत्यक्षात सुतारकाम व मोटार मेकॅनिक हे ट्रेड यापूर्वी शिकविले गेले आहे.
- सुतारकामासाठी २० विद्यार्थी माहे नोव्हेंबर २०१८ पासून सतत गैरहजर आहेत तर मोटार मेकॅनिकलसाठी २० विद्यार्थी माहे ऑक्टोबर २०१८ सतत गैरहजर आहेत.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्र पाथरज येथील नियुक्त केलेल्या मानधनावरील कर्मचारी यांचे आदेशात विद्यार्थी संख्या गोळा करण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे. मात्र ऑक्टोबर २०१८ व नोव्हेंबर २०१८ पासून गैरहजर विद्यार्थ्यांना पुन्हा प्रशिक्षण केंद्रात गोळा करण्याबाबत कुठलीही कार्यवाही केली नाही.
- मानधनावर नियुक्त केलेले कर्मचारी माहे ऑक्टोबर २०१८ पासून आठवड्यातून केंव्हातरी येवून हजेरीपटावर स्वाक्षऱ्या करित आहेत.
- मानधनावर नियुक्त केलेले कर्मचारी यांनी दि. २५.३.२०१९ रोजी प्रकल्प अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात ऑक्टोबर २०१८ पासून सर्व विद्यार्थी प्रशिक्षण केंद्रात येण्याची मानसिकता नसल्यामुळे व रॉ मटेरियल नसल्यामुळे गैरहजर आहेत असे लिहून दिले आहे.
- शासकीय आश्रमशाळा पाथरज येथील तुटलेले बेंच प्रशिक्षण केंद्राच्या आवारात/व्हरांड्यात आहे. सुतारकामाचे रॉ-मटेरियल (तुटलेले बेंच) उपलब्ध आहे. मुख्याध्यापकांनी सुध्दा त्यांना बेंचेस दुरुस्त करण्याबाबत निर्देश दिले होते. याबाबत कर्मचाऱ्यांची उदासिनता दिसून आली आहे.

**३.४.१०. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, कोटगुल)

- सदर केंद्र सन २०१७ पासून बंद असल्यामुळे तेथिल कपाटाला वाळवी लागल्याने सर्व दस्तऐवज नष्ट झालेले आहे.
- तसेच विद्यार्थी/प्रशिक्षणार्थी संख्या ही निरंक आहे.
- साधन सामुग्री उपलब्ध असून काही निकामी झालेली आहेत.

- कंत्राटी कर्मचारी प्रशिक्षण केंद्र बंद असल्यामुळे सदर केंद्रावर कार्यरत नसून त्यांना प्रकल्प कार्यालय, गडचिरोली यांचे आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर शैक्षणिक वर्षात वेळोवेळी सामावून घेण्यात आलेले आहे.

**३.४.११. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, कसनसूर)

- व्यवसाय प्रशिक्षण केंद्राचे मुख्य निदेशक यांनी केंद्र नियमित सुरु ठेवून केंद्रामधील ट्रेडचा कालावधी १ किंवा २ वर्ष करावा जेणेकरून प्रशिक्षणार्थींना शासकीय रोजगार प्राप्त होईल अशी मागणी केली आहे.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कसनसूर ता. एटापल्ली जि. गडचिरोली हे केंद्र २००२ – ०३ पासून सुरु आहे.
- सदर केंद्रामध्ये १. ऑईल इंजिन दुरुस्ती, २. विजतंत्री, ३. रेडीओ ट्रान्झीस्टर या ट्रेडचे ४ महिने कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येते.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामधून प्राप्त प्रमाणपत्राला शासकीय मान्यता नाही. त्यामुळे केंद्र सुरु झाल्यापासून आतापर्यंत एकाही प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार प्राप्त झालेला नाही. त्यामुळे केंद्रातून प्रशिक्षण घेण्यास प्रशिक्षणार्थी इच्छूक नसतात.
- शासनाने आदिवासी युवकांना रोजगार प्राप्त होऊन त्यांचे राहणीमान, आर्थिक परिस्थिती सुधारणेसाठी केंद्र सुरु केले होते परंतु शासनाचा हा हेतू आतापर्यंत साध्य झालेला दिसून येत नाही.
- केंद्राची चौकशी/तपासणी करणेसाठी वेळोवेळी कार्यालयाकडून नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी केंद्राला भेट दिली तेंव्हा – तेंव्हा (बहुतेक वेळा) केंद्रामध्ये प्रशिक्षण व प्रशिक्षणार्थी आढळून आले नाही. त्यामुळे केंद्राला मानधन व विद्यावेतन देताना विचार करावा लागतो.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्र नियमित सुरु ठेवून शासनाचा हेतू पूर्ण होताना दिसून येत नाही. तेंव्हा सदर केंद्र बंद करण्यात येऊन सदर केंद्रामधील कर्मचाऱ्यांचे इतरत्र समायोजन करण्यात यावे.

**३.४.१२. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, कवडस)

- सन २०१९ – २० मध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कवडस येथील मानधनावरील कर्मचारी यांचे मानधन तसेच प्रवेशित विद्यार्थी विद्यावेतन माहे मार्च २०२० पर्यंत अदा करण्यात आलेले आहे.
- मा. आयुक्त आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य नाशिक यांचे पत्र दि. १६ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कवडस जि. नागपूर सन २०२० – २१ पासून सद्यस्थितीत बंद आहे. त्याबाबतची सद्यस्थिती वरिष्ठ कार्यालयास वेळोवेळी सादर करण्यात आली असून सन २०२० – २१ करिता सदर केंद्र सुरु करण्यात यावे किंवा कसे तसेच सदर मानधनावरील कर्मचारी यांचे आदेशात मुदतवाढ देण्यात यावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. तेंव्हा सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कवडस सुरु करणेबाबत कुठलेच निर्देश वरिष्ठस्तरावरून प्राप्त न झाल्याने सन २०२० – २१ मध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कवडस येथील मानधनावरील कर्मचारी यांचे मानधन आदेशात मुदतवाढ देण्यात आलेली नाही. तसेच मा. अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांचे पत्र क्र. ४६६८/२१ दि. २६/८/२०२१ अन्वये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे.
    १. सन २०२१ – २२ या सत्रात आपल्या अधिनस्त असलेले प्रशिक्षण केंद्र सद्यस्थितीत चालू ठेवण्यात येऊ नये.
    २. सन २०२१ – २२ करिता आपल्या अधिनस्त व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालू करावयाचे असल्यास सविस्तर स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे.
    ३. प्रशिक्षण केंद्र चालू ठेवल्यास प्रशिक्षण केंद्रातील मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या देय होणारे मानधना करिता या कार्यालयाकडून (वरिष्ठ) सन २०२१ – २२ करिता तरतूद उपलब्ध करून देण्यात येणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी.
- व्यवसाय प्रशिक्षण केंद्र येथील अभ्यासक्रमांना तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नसल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना प्राप्त प्रमाणपत्रावर नोकरी/रोजगार प्राप्त करून घेता येत नाही. परंतु प्रशिक्षण पूर्ण झालेले काही प्रशिक्षणार्थी स्वबळावर त्यांचे क्षेत्रात स्वयं रोजगार करीत असल्याचे संबंधित केंद्राचे कर्मचारी यांनी तसेच संलग्न मुख्याध्यापक यांनी कळविले आहे.

- तेंव्हा अभ्यासक्रमांना तंत्र शिक्षणाची मान्यता नसणे ही बाब विचारात घेता सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र ही योजना सद्यास्थितीत बंद करून अनुसूचित जमातीच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना तंत्र शिक्षण उपलब्ध करून देणेस्तव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राशी संलग्न करणे उचित राहील.

**३.४.१३. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, रूपापेठ/देवडा)

- शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळा संलग्न व्यवसाय प्रशिक्षण केंद्र रुपापेठ ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथील केंद्राची वस्तुस्थिती व कार्यरत कर्मचाऱ्यांचे कर्तव्य कालावधी लक्षात घेता सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात यावे अशी या कार्यालयाची धारणा आहे.

**३.४.१४. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, कडीकसा)

- प्रकल्प अधिकारी देवरी यांनी सदर प्रशिक्षण केंद्र सुरु ठेवावे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय सादर केलेले नाही.

**३.४.१५. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार :** (व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, विनवळ)

- प्रकल्प कार्यलय जव्हार यांनी प्रपत्रातील माहिती उपलब्ध करून दिली आहे. परंतु सदर प्रशिक्षण केंद्र सुरु ठेवावे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय सादर केलेले नाही.

# प्रकरण चौथे

# निष्कर्ष व शिफारशी

## ४.१. निष्कर्ष :

### ४.१.१. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु आलेल्या शासकीय आश्रमशाळेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे आलेले निष्कर्ष :

१) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे एकूण व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी ६६.६७ % व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी आवश्यक इतकी विद्यार्थी संख्या उपलब्ध होते व ३३.३३ % व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणासाठी आवश्यक इतकी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नाही.

२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याच्या कारणांमध्ये प्रामुख्याने सदर प्रशिक्षणामुळे नोकरी मिळत नाही, व्यवसायासाठी कर्ज मिळत नाही, प्रशिक्षणाच्या प्रमाणपत्राला व अभ्यासक्रमाला तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही, प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे, प्रशिक्षण केंद्रात अनुभवी शिक्षक/औद्योगिक वसाहत/प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध होत नाही, भौगोलिक दुर्गमता/साधनसामुग्रीची कमतरता व सदर प्रशिक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता आढळून येते/विद्यार्थी मिळत नाही/विद्यार्थी प्रशिक्षण मध्येच सोडून जातात इ. स्वरुपाची कारणे व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी नमूद केली आहेत.

३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होत नाही असे ५० % प्रशिक्षण केंद्रांनी सांगितले व १६ % प्रशिक्षण केंद्रांनी रोजगार उपलब्ध होतो किंवा नाही याबाबत माहिती नाही असा प्रतिसाद नोंदविला आहे.

४) विद्यार्थ्यांना/प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात ड्रेस मेकिंग, संगणक/माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण, ब्युटीपार्लर प्रशिक्षण, अन्न तंत्रज्ञान, हॉटेल व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, शेळी पालन, LED/LCD रिपेरिंग, मोबाईल रिपेरिंग, वेल्डिंग, नळ फिटिंग व चारचाकी/दुचाकी दुरुस्ती इ. स्वरूपाच्या कोर्सेचे प्रशिक्षण देण्याची मागणी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी केली आहे.

५) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील तीन महिने नगरात अथवा उपनगरात प्रात्यक्षिक करण्याची संधी एकूण व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी २५ % व्यवसाय प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून देतात व ५८ % व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध करून देत नाही.

६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करावे असे २५ % व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी असे प्रश्नावलीमध्ये अभिप्राय नोंदविले. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करण्याची प्रामुख्याने सदर प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींना रोजगार/नोकरी मिळत नाही, विद्यार्थी स्वावलंबी होत नाही, प्रशिक्षणावर आधारित व्यवसायासाठी बँकेकडून कर्ज मिळत नाही, प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांना मानधन वेळेवर मिळत नाही, सदर प्रशिक्षण अभ्यासक्रमास तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नाही, प्रशिक्षण केंद्रात अनुभवी शिक्षक/साधन सामुग्रीची कमतरता आहे व प्रशिक्षण केंद्रांचे मूल्यमापन होत नाही इ. कारणे व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी सांगितली आहे.

७) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करू नये असे ५८ % व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी सांगितले आहे. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद न करण्याची प्रामुख्याने – सदर प्रशिक्षणामुळे अल्प प्रमाणात परंतु स्वयं रोजगार उपलब्ध करून देणारे साधन, आदिवासी डोंगराळ भागात अल्प –कुशल कारागीर निर्माण होण्यास मदत होते, अति-दुर्गम भागात व्यवसाय प्रशिक्षणाचे इतर पर्याय उपलब्ध नसल्याने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रास विद्यार्थी उपलब्ध होतात, शिवणकाम व ब्युटीपार्लर या कौशल्यामुळे युवतींना स्वयंरोजगार प्राप्त होतो इ. कारणे व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी सांगितली आहे.

८) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद केल्यास तेथे काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामांसाठी वापर करता येऊ शकतो. त्यामध्ये -

- आश्रमशाळेतील इलेक्ट्रिक फिटिंग, मोटार दुरुस्ती, नळ फिटिंग, सुतारकाम, तारकाम व शिवणकामाशी संबंधित कामे करून घेणे.
- आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय प्रशिक्षण तासिका घेणे/व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमाची ओळख करून देणे.
- आदिवासी विकास विभाग अंतर्गत वर्ग ४ च्या पदांवर काम करणे (उदा. सुरक्षारक्षक, स्वयंपाकी, कामाठी इ.).

- लेखा लिपीक कामासाठी या कर्मचाऱ्यांचा वापर करता येऊ शकतो असे व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांनी मत नोंदविले आहे.

९) एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात ११० कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यामध्ये गट निदेशक १०, शिल्प निदेशक ५६, लेखापाल ९, रोखपाल १, वर्कशॉप सहाय्यक १५, कार्यशाळा परिचर १ व शिपाई १८ इ. पदांवर काम करणारे कर्मचारी आहेत.

१०) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील एकूण ११० कर्मचाऱ्यांपैकी अनुसूचित जमातीचे ७७, अनुसूचित जातीचे १०, इतर मागासवर्ग १५ व सामान्य वर्गातील ८ या संवर्गातील कर्मचारी आहेत.

११) एकूण कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ४४ (३९.९८%) कर्मचाऱ्यांचे वय ४० पेक्षा कमी आहे व ६६ (५९.९९%) कर्मचाऱ्यांचे वय ४० पेक्षा जास्त आहे.

१२) एकूण कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ३१ (२८.१८ %) इतके कर्मचारी दहावी व दहावी पेक्षा कमी शिक्षण असणारे आहेत व दहावी पेक्षा जास्त शिक्षण असणारे ७९ (७१.८१ %) इतके कर्मचारी आहेत.

१३) कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण केलेले ७५ कर्मचारी आहेत. त्यामध्ये गट निदेशक ९, शिल्प निदेशक ५३, लेखापाल ४, कार्यशाळा परिचर १, वर्कशॉप सहाय्यक ५ व शिपाई ३ असे कर्मचारी आहेत.

**४.१.२. अपर आयुक्त कार्यालय यांचे प्राप्त झालेली माहिती व अभिप्रायाच्या आधारे आलेले निष्कर्ष :**

अपर आयुक्त कार्यालय, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या आधारे आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

१) अपर आयुक्त कार्यालय, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्यापासून आजतगायत एकूण २०८४७ विद्यार्थी/प्रशिक्षणार्थींनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतले आहे.

२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रिशियन/मोटार रिपेअरींग, डिझेल इंजिन/मोटार मॅकॅनिक, टि.व्हि./रेडीओ रिपेअरींग, शिवणकाम, ब्युटीपार्लर, मेकॅ. आर.ए.सी., फिटर, ड्रेस मेकिंग, वेल्डर इ. स्वरूपाच्या व्यवसाय प्रशिक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

३) अपर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे अभिप्रायानुसार १) एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, किनवट अंतर्गत असलेले सारखणी येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सन २०१५ — १६ पासून बंद आहे, २) एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा अंतर्गत असलेले कापरा येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सन २००८ — ०९ पासून बंद आहे व ३) एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, धारणी अंतर्गत असलेले सावलीखेडा येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सन २०१८ — १९ पासून बंद आहे. तेव्हा सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे बंद करण्यात येण्याकरिता शिफारस करण्यात आली आहे.

४) अपर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे अभिप्रायानुसार व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी मंजूर क्षमतेएवढे विद्यार्थी मिळत नाही. तसेच सदर व्यवसाय प्रशिक्षणास दिल्ली बोर्डाची मान्यता नसल्याने त्या प्रमाणपत्राच्या आधारे रोजगार उपलब्ध होत नाही.

५) अपर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे अभिप्रायानुसार व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील साधनसामुग्री औद्योगिक प्रशिक्षण केंद्रास उपयोगी असल्यास त्यांना देण्यात यावी व अति प्रमाणात खराब झालेल्या साधनसामुग्रीचे निर्लेखन करण्यात यावे.

६) अपर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे अभिप्रायानुसार व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन बहुउद्देशीय कर्मचारी संवर्गात समाविष्ट करता येईल परंतु याकरिता कायदेशीर बाबी तपासून घेणे उचित राहील.

७) अपर आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे अभिप्रायानुसार व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमांना तंत्र शिक्षण विभागाची मान्यता नसल्यामुळे प्रशिक्षणार्थींना प्राप्त प्रमाणपत्राचे आधारे नोकरी/रोजगार प्राप्त करून घेता येत नाही. त्यासाठी आय.टी.आय. प्रमाणे प्रमाणपत्र मिळावी.

८) अपर आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे अभिप्रायानुसार व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे सुरु ठेवायची असतील तर त्यांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे.

९) अपर आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे अभिप्रायानुसार सदर केंद्रामध्ये बऱ्याच वर्षापासून उपलब्ध असलेल्या योग्य साधनसामुग्रीचा लिलाव करण्यात यावा व कालबाह्य झालेल्या सामुग्रीचे निर्लेखन करण्यात यावे.

१०) अपर आयुक्त कार्यालय ठाणे व नाशिक यांनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांविषयी स्वतंत्र अभिप्राय सादर केले नाहीत.

**४.१.३. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडून प्राप्त झालेली माहिती व अभिप्रायाच्या आधारे आलेले निष्कर्ष :**

१) बहुतांश (७७.७८ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांना अभ्यासक्रम निहाय लागणारी आवश्यक साधनसामुग्री दरवर्षी देण्यात येत नाही.

२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांना शासनाकडून प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीसाठी दरसाल निधी उपलब्ध होत नाही.

३) बहुतांश (६६.६७ %) प्रकल्प कार्यालयाकडून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडील दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागविला जात नाही.

४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड ही जाहिरात, मुलाखत, त्यांची शैक्षणिक अर्हता व गुणवत्ता इ. च्या आधारे करण्यात आलेली आहे.

५) बहुतांश (६६.६७ %) प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा नाही.

६) प्रकल्प कार्यालय यांचे कडून आलेल्या माहितीच्या आधारे ४४.४४ % प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवावे असे सांगितले आहे व ५५.५६ % प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवू नये.

७) व्यवसाय प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम कालबाह्य झालेला आहे. तसेच अभ्यासक्रमाचा कालावधी खूप कमी आहे. त्यामुळे विहित कौशल्य पूर्णपणे आत्मसात केल्याचा आत्मविश्वास प्रशिक्षणार्थींमध्ये येत नाही. व्यवसाय प्रशिक्षणासाठी कोणताच अभ्यासक्रम ठरवून देण्यात आलेला नाही.

८) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणाऱ्या प्रत्येक अभ्यासक्रमाचा कालावधी चार महिन्याचा आहे. या चार महिन्यातील प्रशिक्षणाच्या आधारे कुठेही रोजगार उपलब्ध होत नाही. सदर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र दिले जात नसल्यामुळे स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे व्यवसाय प्रशिक्षणासाठी तरुण मुले/मुली आकर्षित होत नाही.

९) व्यवसाय प्रशिक्षणासाठी स्वतंत्र इमारत व कुशल तांत्रिक कर्मचारी असणे तसेच प्रशिक्षण साहित्य चांगल्या दर्जाचे सुस्थित व पुरेसे असणे आवश्यक आहे.

१०) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना प्रवेश घेणेसाठी कुठलीही प्रवेश प्रक्रिया किंवा अतिरिक्त निकष नाही कारण प्रशिक्षण केंद्रात क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थी प्रवेश घेतात.

११) ज्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिमाह रु. ७००/- इतके विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा चार महिने कालावधी पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनाच विद्यावेतन देण्यात येते.

१२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांसाठी स्वतंत्र इमारत नसून शासकीय आश्रमशाळेतील वर्गात व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच प्रशिक्षण केंद्र सुरु झाले त्यावेळी मिळालेले प्रशिक्षणासाठीचे साहित्य सद्यस्थितीत निरुपयोगी झाले आहे.

१३) बहुतेक प्रशिक्षणार्थी चार महिन्याचा एकच अभ्यासक्रम पूर्ण करतात. पुढील दोन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थी इच्छूक नसतात.

१४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवायचे असल्यास अभ्यासक्रमात – वीजतंत्री, तारतंत्री, यांत्रिक मोटारगाडी, यांत्रिक डीझेल, शिवणकाम, प्रयोगशाळा तंत्रज्ञान, संगणक, वायरमन, ब्युटीक टेलरिंग आणि फॅशन, इलेक्ट्रोनिक टेक्नोलॉजी, वेल्डिंग आणि डायमेकर इ. ट्रेड/अभ्यासक्रम चालू करणे आवश्यक आहे.

१५)शासन मान्य खाजगी संस्थांचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु असलेल्या ठिकाणीच्या अभ्यासक्रम, शुल्क व कालावधी इ. निश्चित केलेले आहे. त्यामुळे या संस्थांची विहित कार्यपद्धतीने निवड करून शासकीय आश्रमशाळा येथे कार्यरत असलेले व्यवसाय प्रशिक्षण ठराविक कालावधीत त्यांच्याकडे देण्याबाबत विचार व्हावा. तसेच या केंद्राचे सनियंत्रण करण्यासाठी जवळील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य व प्रकल्प अधिकारी यांची समिती असावी व त्यांनी सदर योजनेच्या परिणामकारकतेबाबत नेहमी आढावा घ्यावा असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर यांनी त्यांच्या अभिप्रायमध्ये नमूद केले आहे.

१६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमांना तंत्र शिक्षणाची मान्यता नसणे ही बाब विचारात घेता सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र ही योजना सद्यास्थितीत बंद करून अनुसूचित जमातीच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना तंत्र शिक्षण उपलब्ध करून देणेस्तव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राशी संलग्न करणे उचित राहील असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नागपूर यांनी त्यांच्या अभिप्रायमध्ये नमूद केले आहे.

१७) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र येथील निदेशकांचे तात्पुरत्या स्वरुपात प्रकल्प कार्यालय अंतर्गत शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे आणि सैन्य व पोलीसभरतीपुर्व प्रशिक्षण केंद्रात आवश्यकतेनुसार वर्ग चार पदावर मानधन तत्वावर पर्यायी व्यवस्थेने समायोजन करण्याबाबत तसेच व्यवसाय प्रशिक्षण केद्रास मंजुर असणाऱ्या मानधनानुसार मानधन देण्यास हरकत नाही असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये नमूद केले आहे.

१८) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी अनेक वर्ष काम केले असल्यामुळे त्यांना इतरत्र आश्रमशाळेतील समकक्ष पदावर सामावून घेण्यात यावे असे भामरागड व यावल या प्रकल्प कार्यालयाने अभिप्राय दिले आहे व गडचिरोली या प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रकल्प कार्यालयाच्या आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर

शैक्षणिक वर्षात वेळोवेळी सामावून घेण्यात आलेले आहे असे अभिप्राय दिले आहे. तसेच घोडेगाव प्रकल्प कार्यालयाने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने समायोजन करण्यात यावे असे अभिप्राय दिले आहे. प्रकल्प कार्यालय चंद्रपूर यांनी दिलेल्या अभिप्रयामध्ये केंद्राची वस्तुस्थिती व कार्यरत कर्मचाऱ्यांचे कर्तव्य कालावधी लक्षात घेता सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात यावे अशी या कार्यालयाची धारणा आहे. एकूण १० प्रकल्प कार्यालयाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत सुस्पष्ट असे अभिप्राय दिलेले नाही.

१९) एकूण १५ प्रकल्प कार्यालयापैकी १० प्रकल्प कार्यालयाने सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करावे असे अभिप्राय दिले आहे व २ प्रकल्प कार्यालयाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालू ठेवावे असे अभिप्राय दिले आहे. ३ प्रकल्प कार्यालयाने याबाबत सुस्पष्ट असे अभिप्राय दिलेले नाही.

२०) सद्यस्थितीत एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी सर्वच व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद स्थितीत असून त्यामधील ६ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कोविड – १९ संसर्गाच्या कारणास्तव बंद आहेत.

## ४.२. शिफारशी :

शासनाने शासन निर्णय क्र. व्यशि-२०२०/प्र.क्र.३८/का.९ दि.०१/१२/२०२० अन्वये गठीत केलेल्या समितीने शासकीय पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र या योजनेचा मूल्यमापन अभ्यास करून केलेल्या शिफारसी पुढीलप्रमाणे.

१) सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन करून ती चालू ठेवणे किंवा बंद करणेबाबत शिफारस करणे.

**शिफारस** - अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांनी दिलेली माहिती व अभिप्रायांच्या आधारे - व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नाही, सदर प्रशिक्षणामुळे रोजगार उपलब्ध होत नाही, प्रशिक्षण केंद्रात साधनसामुग्रीची कमतरता, प्रशिक्षणाच्या प्रमाणपत्राला व अभ्यासक्रमाला तंत्रशिक्षण विभागाची मान्यता नाही इ. कारणांच्या अनुषंगाने तसेच एकूण १५ प्रकल्प कार्यालयांपैकी १० प्रकल्प कार्यालायांने सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे बंद करण्याची शिफारस केली आहे.

२) सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु ठेवायचे असल्यास त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करून अधिक सक्षमपणे कशी चालविता येतील याबाबत शिफारस करणे.

**शिफारस** - अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांनी दिलेली माहिती व अभिप्रायानुसार सदर प्रशिक्षण केंद्रे सक्षमपणे राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख प्रशिक्षण देण्यात यावे. त्यामुळे सदर प्रशिक्षण केंद्रे ठेवायची असल्यास विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देणारे ड्रेस मेकिंग, संगणक/माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण, ब्युटीपार्लर प्रशिक्षण, अन्न तंत्रज्ञान, हॉटेल व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण, शेळी पालन, LED/LCD रिपेरिंग, मोबाईल रिपेरिंग, वेल्डिंग, नळ फिटिंग व चारचाकी/दुचाकी दुरुस्ती इ. स्वरुपाची सर्व साधनसामुग्रीयुक्त कोर्सेचे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच सदर प्रशिक्षण अभ्यासक्रमास शासकीय तंत्रशिक्षण विभागाची मान्यता असावी व शासकीय प्रशिक्षण संस्थेप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र प्रशिक्षणार्थीना देण्यात यावे.

३) सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करावयाची झाल्यास तेथील साधनसामुग्री व अन्य बाबींचा कशाप्रकारे वापर करता येईल व तेथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे अन्य ठिकाणी समायोजन करता येईल किंवा कसे याबाबत शिफारस करणे.

**शिफारस** - अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांनी दिलेली माहिती व अभिप्रायानुसार –

१) प्रशिक्षण केंद्रातील उपयोगी साधनसामुग्री शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात देण्यात यावी अथवा त्या साधनसामुग्रीचा लिलाव करण्यात यावा व निरुपयोगी झालेल्या साधनसामुग्रीचे निर्लेखन करण्यात यावे.

२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आश्रमशाळेतील अ) इलेक्ट्रिक फिटिंग, मोटार दुरुस्ती, नळ फिटिंग, सुतारकाम, तारकाम व शिवणकाम इ. कामे करून घेणे, ब) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय प्रशिक्षणाच्या तासिका घेणे/व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमाची ओळख करून देणे, क) आदिवासी विकास विभाग अंतर्गत वर्ग ४ पदावर काम करणे (उदा. सुरक्षारक्षक, स्वयंपाकी, कामाठी इ.) व लेखा लिपिक कामे करणे इ. कामांसाठी कंत्राटी पद्धतीने घेण्यात यावे. **अथवा** प्रकल्प कार्यालय अंतर्गत शासकीय आश्रमशाळा, वसतिगृह आणि

सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात आवश्यकतेनुसार वर्ग ४ पदावर मानधन तत्वावर पर्यायी व्यवस्थेने घेण्यात यावे.

**सदस्य सचिव यांनी सुचविलेली शिफारस :**

१) आदिवासी विकास विभागाच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्राव्यातिरिक्त सध्या कार्यरत इतर योजनेंतर्गत सुरु असलेल्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची संख्या वाढविण्यात यावी.

२) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (ITI) देखील अनुसूचित जमातीच्या राखीव जागा वाढविण्यात यावेत.

सबब, उपरोक्त प्रमाणे अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय व शासकीय पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांनी दिलेली माहिती व अभिप्रायानुसार सदर व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालू ठेवावे किंवा बंद करावे, तेथिल उपलब्ध साधनसामुग्री व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत पुढील कार्यवाही शासनस्तरावरून व्हावी असे मत आहे.

(जागृती कुमरे)
सहसंचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
तथा
सदस्य सचिव, मूल्यमापन अभ्यास समिती

(डॉ. राजेंद्र भारुड भा.प्र.से.)
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
तथा
अध्यक्ष, मूल्यमापन अभ्यास समिती

# प्रश्नावली

## १) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचेसाठीची प्रश्नावली :

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**<br>**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.** | दूरध्वनी- ०२०-२६३६०९४१<br>फॅक्स- ०२०-२६३६००२६<br>Email: trti.mah@nic.in |

**पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र – मूल्यमापन**
**प्रशिक्षण केंद्रासाठीची प्रश्नावली**

---

१) व्यवसाय प्रशिक्षण केंद्राचे नाव :

२) संपूर्ण पत्ता :

३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कधीपासून सुरु झाले (वर्ष) :

४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरुवात झाल्यापासून आजतगायत sबाब निहाय झालेला एकूण खर्चाचा तपशील :

(रु. लाखात)

| अ.क्र. | वर्ष | बाब | | |
|---|---|---|---|---|
| | | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतनावरील एकूण खर्च |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |

**टीप :** साधनसामुग्रीवरील खर्च नमूद करतांना प्रथम वर्षी घेण्यात आलेल्या संपूर्ण साधनसामुग्रीची अनावर्ती रक्कम स्वतंत्रपणे नमूद करावी व त्यानंतर प्रतिवर्षी करण्यात आलेल्या साधनसामुग्री/कच्चा माल इ. बाबतच्या आवर्ती खर्चाच्या रकमा नमूद कराव्यात.

५) व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरुवात झाल्यापासून आजतगायत अभ्यासक्रम निहाय व वर्ष निहाय प्रवेश घेतलेल्या व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या :

| अ. क्र. | वर्ष | अभ्यासक्रम | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रिशन/ मोटार रिपेअरींग | | डिझेल इंजिन/मोटार मॅकॅनिक | | गवंडी काम | | टी.व्ही./रेडीओ रिपेअरींग | | शिवणकाम | | सुतार काम | | इतर | |
| | | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले | प्रवेश घेतलेले | उत्तीर्ण झालेले |
| १. | | | | | | | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | | | | | | | |
| ५. | | | | | | | | | | | | | | | |

**टीप :** उपरोक्त अभ्यासक्रमापैकी एखादा अभ्यासक्रम उपलब्ध नसल्यास अथवा इतर अभ्यासक्रम शिकवला जात असल्यास त्याचीही माहिती वरील तक्त्यात भरावी.

६) प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रमनिहाय कोणकोणती साधनसामुग्री लागते त्याचा तपशील व त्यावर अंदाजे दरसाल होणारा खर्च :

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रत्येक्ष व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध साधन सामुग्री | व्यवसाय प्रशिक्षणासाठी लागणारी साधनसामुग्री | दरसाल होणारा खर्च (हजारात) |
|---|---|---|---|---|
| १. | इलेक्ट्रिशन/मोटार रिपेअरींग | | | |
| २. | डिझेल इंजिन / मोटार मॅकॅनिक | | | |
| ३. | गवंडी काम | | | |
| ४. | टी.व्ही./रेडीओ रिपेअरींग | | | |
| ५. | शिवणकाम | | | |
| ६. | सुतार काम | | | |
| ७. | इतर | | | |

७) व्यवसाय प्रशिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात येत होते का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐

८) व्यवसाय प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी प्रति महिना किती विद्यावेतन दिले जात होते ?

☐

९) मागील तीन वर्षात वेगवेगळ्या कौशल्य शाखांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या विद्यावेतनावरील खर्चची माहिती :

| अ. क्र. | वर्ष | अभ्यासक्रम | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रिशन/ मोटार रिपेअरींग | | डिझेल इंजिन/ मोटार मॅकॅनिक | | गवंडी काम | | टी.व्ही./रेडीओ रिपेअरींग | | शिवणकाम | | सुतार काम | | इतर | |
| | | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च | प्रशिक्षणार्थीं ची संख्या | विद्यावेतनाव रील खर्च |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

**टीप :** प्रशिक्षण केंद्र बंद असल्यास ते ज्या वर्षापासून बंद असेल त्यापूर्वीच्या तीन वर्षाची माहिती देण्यात यावी.

१०) व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना तीन महिने नगरातील अथवा उपनगरातील सराव प्रात्यक्षिक करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) काही प्रमाणात ☐ ड) सांगता येत नाही ☐

११) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होते का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐

१२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात आवश्यक तेव्हढी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याची कारणे नमूद करा ?

१)

२)

३)

१३) व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी उत्सुक आहेत का ? अ) होय ☐ ब) नाही ☐

१४) व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी उत्सुक नसल्यास त्याची कारणे नमूद करा ?

१)

२)

३)

१५) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभ्यासक्रमावर परीक्षा घेतली जाते का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐

१६) आपल्या प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेल्या मागील तीन वर्षातील एकूण विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांना सदर प्रशिक्षणामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे ? ☐

१७) प्रशिक्षण केंद्रात चालू असलेल्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर कोणते व्यवसाय अभ्यासक्रम मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतात असे आपणास वाटते ?

१)

२)

३)

१८) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात बंद करावे असे आपणास वाटते का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐

१९) होय असल्यास, बंद करण्याची कारणे ?

१)

२)

३)

२०) नाही असल्यास, बंद न करण्याची कारणे ?

१)

२)

३)

२१) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात काम करत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आश्रमशाळेतील इतर कामासाठी वापर करता येऊ शकतो का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

२२) होय असल्यास, प्रामुख्याने कोणत्या कामासाठी वापर करता येऊ शकतो ती कामे नमूद करा ?

१)

२)

३)

२३) नाही असल्यास, त्याचे कारणे कोणती ते नमूद करा ?

१)

२)

३)

२४) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल घेण्यात येतो का ?

अ) होय ☐ आ) नाही ☐

२५) मागील तीन वर्षातील विद्यार्थ्यांची विस्तृत माहिती पुढील तक्त्याच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात यावी ?

| **अ. क्र.** | **प्रशिक्षणार्थी चे नाव** | **वय** | **शिक्षण** | **पत्ता** | **संपर्क क्र.** | **प्रशिक्षण घेतलेले वर्ष** | **प्रशिक्षण घेतलेला अभ्यासक्रम** | **सद्यस्थितीत व्यवसायात/नोकरीत कार्यरत आहे का ? (होय/नाही)** | **सद्यस्थितीत व्यवसायात/नोकरीत कार्यरत असल्यास मिळणारे मासिक उत्पन्न (रु.)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

२६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात घेत असलेल्या सर्व अभ्यासक्रमाची पुस्तके उपलब्ध करून द्यावी.

२७) कंत्राटी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्तीची पध्दत व नियुक्ती आदेश उपलब्ध करून द्यावे.

२८) व्यवसाय प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड पध्दती कोणती यासंबंधीची माहिती उपलब्ध करून द्यावी.

| **क्षेत्रीय कामाचा तपशील :** | |
|---|---|
| माहिती देणाऱ्या मुख्याध्यापक/शिक्षकाचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| माहिती घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| दिनांक : | ठिकाण : |

## २) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचेसाठीची प्रश्नावली :

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**<br>**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.** | दूरध्वनी- ०२०-२६३६०९४१<br>फॅक्स- ०२०-२६३६००२६<br>Email: trti.mah@nic.in |

### पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र – मूल्यमापन
### प्रकल्प कार्यालय यांचेसाठीची प्रश्नावली

१) आपल्या प्रकल्प कार्यालय अंतर्गत एकूण किती पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र आहेत ?

२) एकूण पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी किती प्रशिक्षण केंद्र सद्यस्थितीत सुरु आहेत ?

३) एकूण पोस्ट बेसिक व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांपैकी जी प्रशिक्षण केंद्र सद्यस्थितीत सुरु नाहीत त्याची कारणे कोणती ?

१)

२)

३)

४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची सुरुवात झाल्यापासून आजतगायत बाब निहाय झालेला एकूण खर्चाचा तपशील पुढील तक्त्यात नमूद करावा :

**(रु. लाखात)**

| अ.क्र. | वर्ष | बाब | | |
|---|---|---|---|---|
| | | व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षक/कर्मचाऱ्यांचे मानधन | व्यवसाय प्रशिक्षणासाठी घेतलेल्या साधनसामुग्रीचा खर्च | विद्यावेतनावरील एकूण खर्च |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |

**टीप :** साधनसामुग्रीवरील खर्च नमूद करतांना प्रथम वर्षी घेण्यात आलेल्या संपूर्ण साधनसामुग्रीची अनावर्ती रक्कम स्वतंत्रपणे नमूद करावी व त्यानंतर प्रतिवर्षी करण्यात आलेल्या साधनसामुग्री/कच्चा माल इ. बाबतच्या आवर्ती खर्चाच्या रकमा नमूद कराव्यात.

५) प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम निहाय लागणारी साधनसामुग्री दरवर्षी देण्यात येते का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

६) होय असल्यास प्रशिक्षण केंद्र सुरु झालेपासून ते आजतगायत देण्यात आलेल्या साधनसामुग्रीचा अभ्यासक्रमनिहाय झालेल्या खर्चाची माहिती पुढील तक्त्यात नमूद करावी.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात देण्यात येणारी साधनसामुग्री | दरसाल होणारा खर्च (हजारात) |
|---|---|---|---|
| १. | इलेक्ट्रिशन/मोटार रिपेअरींग | | |
| २. | डिझेल इंजिन / मोटार मॅकॅनिक | | |
| ३. | गवंडी काम | | |
| ४. | टी.व्ही./रेडीओ रिपेअरींग | | |
| ५. | शिवणकाम | | |
| ६. | सुतार काम | | |
| ७. | इतर | | |

७) नाही असल्यास त्याची कारणे कोणती ?

अ) प्रशिक्षण केंद्राकडून यासंबंधी मागणी केली जात नाही. ☐

ब) प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी साधनसामुग्रीची आवश्यकता भासत नाही. ☐

क) शासनाकडून साधनसामुग्रीसाठीचा दरसाल निधी उपलब्ध होत नाही. ☐

ड) प्रशिक्षण केंद्राची सुरुवातीचे वेळी आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे मार्फत देण्यात आला होता. ☐

इ) प्रशिक्षण केंद्राची सुरुवातीचे वेळी प्रकल्प कार्यालया मार्फत देण्यात आला होता. ☐

ई) इतर असल्यास नमूद करावे

८) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांकडून दरवर्षी प्रशिक्षणाविषयीचा अहवाल मागविला जातो का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

९) होय असल्यास आतापर्यंतच्या सर्व वर्षाचे अहवाल या कार्यालयास सादर करावे ?

१०) नाही असल्यास अहवाल न मागविण्याची करणे कोणती ?

१)

२)

३)

११) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर आपल्या कार्यालय अंतर्गत संनियंत्रण केले जाते का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

१२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांवर संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून संनियंत्रण अधिकाऱ्याची निवड करण्यात आली आहे का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

१३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड प्रकल्प कार्यालय मार्फत केली जाते का ?

१४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड पध्दती कोणती ?

(एका पेक्षा जास्त प्रतिसाद नोंदवू शकता)

अ) जाहिरात ☐

ब) मुलाखत ☐

क) शैक्षणिक अर्हता ☐

ड) गुणवत्ता ☐

इ) इतर (नमूद करावे)

१५) निवड झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश किती कालावधीसाठी देण्यात येतात ?

अ) चार महिन्यांसाठी ☐

ब) सहा महिन्यांसाठी ☐

क) अकरा महिन्यांसाठी ☐

ड) दोन वर्षांसाठी ☐

इ) इतर (नमूद करावे)

१६) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा मासिक अहवाल व्यवसाय प्रशिक्षण केंद्राकडून मागविण्यात येतो का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

१७) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्तरावर असलेल्या अडचणी मुख्याध्यापक किंवा कंत्राटी कर्मचारी प्रकल्प कार्यालयात मांडतात का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

१८) होय असल्यास कोणत्या ते नमूद करावे ?

१)

२)

३)

१९) प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी विशिष्ट अभ्यासक्रम ठरवून देण्यात आला आहे का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

२०) होय असल्यास अभ्यासक्रमाची सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

२१) नाही असल्यास व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकवीत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती प्रकल्प स्तरावरून घेण्यात येते का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

२२) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रावर शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा आहे का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

२३) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु ठेवावे असे आपणास वाटते का ?

अ) होय ☐ अ) नाही ☐

२४) होय असल्यास व्यवसाय प्रशिक्षण केंद्र अजून सक्षम करणेसाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक वाटते ते नमूद करा ?

१)

२)

३)

२५) नाही असल्यास व्यवसाय प्रशिक्षण केंद्र भविष्यात सुरु न ठेवण्याची कारणे नमूद करा ?

१)

२)

३)

२६) प्रकल्प स्तरावरून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात नेमण्यात आलेल्या सराव कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सर्व वर्षांचे नियुक्ती आदेशाच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

| **क्षेत्रीय कामाचा तपशील :** | |
|---|---|
| माहिती देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| माहिती घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| दिनांक : | ठिकाण : |